संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




Hero
Destini 125
Destini 110
हिरोची स्कूटर स्कूटरचा हिरो
डेस्टिनी सिरीज़ पासून सुरू होते ₹75150*
कॅश डिस्काउंट ₹3000*
SAIDEEP HERO | 9289922485, ILAKSHI AUTO SALES | 9289922398


रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २३.०३.२०२६ | अंक नं. २९२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*


# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी भारतीय शेअर बाजार कोसळला

## सेन्सेक्स १८०० तर निफ्टी ५५० अंकांनी घसरला, गुंतवणूकदारांना ११ लाख कोटींचा फटका

मुंबई – आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, २३ मार्च रोजी देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आशियाई बाजारांमध्ये विक्रीच्या दबावाचा परिणाम देशांतर्गत शेअर बाजारावरही दिसून येत आहे. दिवसाच्या सुरुवातीला सेन्सेक्स १८०० हून अधिक अंकांनी जमिनीवर आला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टीदेखील ५५० हून अधिक अंकांनी खाली घसरला आहे.

गेल्या आठवड्याला देशांतर्गत बाजार ग्रीन झोनमध्ये क्लोज झालेले पण सोमवारी सकाळी सुरुवातीला देशांतर्गत बाजाराने आघाडी गमावली. देशांतर्गत बाजारातील सकाळच्या ट्रेडिंगमध्ये सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरणीसह व्यवहार करत असून निफ्टी ऑटो, मीडिया, बँक, मेटल आणि पीएसयू बँक निर्देशांक सुमारे २% घसरले. हिंदाल्को, टाटा स्टील, स्टेट बँक ऑफ इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा आणि एचडीएफसी बँकेला सर्वाधिक फटका बसला. या घसरणीमुळे, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे ११ लाख कोटी रुपयांनी कमी होऊन ४१८ लाख कोटी रुपयांवर आले.

### रुपया नवीन नीचांकी पातळीवर

या दरम्यान, भारतीय चलन पुन्हा नव्या नीचांकी पातळीवर कोसळले. सुरुवातीच्या व्यवहारात रुपया डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या नीचांकी पातळी, ०.१% घसरून ९३.८३, वर आला. गेल्या आठवड्यात आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया मागील सत्रात ६४ पैशांनी घसरून प्रति डॉलर ९३.५३ वर बंद झाला होता. पण, वाढत्या जागतिक तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ या पार्श्वभूमीवर परकीय भांडवलाचा सतत होणारा बहिर्वाह यामुळे रुपयावर दबाव आहे.

### शेअर मार्केट घसरणीचे कारण काय

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘इराणने ४८ तासांच्या आत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही, तर तेथील वीज प्रकल्प नष्ट केले जातील’, अशी धमकी दिली तर इराणने देखील प्रत्युत्तर देण्याचा आपला इरादा स्पष्ट केला. अशा परिस्थितीत, २३ मार्च रोजी आशियाई बाजारांमध्ये मोठी घसरण झाली. दक्षिण कोरियाचा शेअर बाजार उघडताच जवळपास सहा टक्क्यांनी घसरला. जपानचा शेअर बाजारही चार टक्क्यांहून अधिक आपटला.

### सोने आणि चांदीच्या दरात पुन्हा मोठी घसरण

एम सी एक्स वरील सोन्याचे दर मागील बंद पातळी १,४४,४९२ च्या तुलनेत ३% घसरून १,४०,१५८ रुपये प्रति १० ग्रॅमवर उघडले. तर काही मिनिटांत आणखी ७,११५ रुपये किंवा ४.९२% इतकी घसरण होऊन दरांनी १,३७,३७७ रुपयांची नीचांकी गाठली. गेल्या आठवड्यात सोन्याच्या किमती १०% हून अधिक कोसळल्या. तसेच एमसीएक्सवर चांदीच्या दरात ६% किंवा १३,६०६ रुपयांची घट होऊन दर प्रति किलो २,१३,१६६ रुपयांवर पोहोचले. देशांतर्गत बाजारात मार्च महिन्यात आतापर्यंत सोने आणि चांदीच्या किमती १२% ते १७% घसरल्या आहेत.


शस्त्रक्रियेशिवाय हृदयाला नवी उर्जा!
हृदयविकाराच्या रुग्णांसाठी आता दिलासा देणारी बातमी!
अहिल्यानगरमध्ये प्रथमच **डॉ. विशाल कल्याण भोसले** यांच्या **अमर्त्य हॉस्पिटलमध्ये** हृदयविकारावर शस्त्रक्रियेशिवाय EECP (Enhanced External Counter Pulsation) थेरपी ही अत्याधुनिक उपचार पद्धती उपलब्ध झाली आहे.
**या उपचार पद्धतीचे वैशिष्ट्ये म्हणजे शस्त्रक्रिया नाही- वेदना नाही, पूर्णतः सुरक्षित उपचार !**


अमर्त्य हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित पाठक यांच्याहस्ते ईईसीपी थेरपी मशिनचे उद्घाटन झाले. समवेत भूलतज्ज्ञ डॉ. कल्याण भोसले, सर्जन डॉ. अशोक शिंदे, भूलतज्ज्ञ डॉ. अशोक कराळे, जनरल फिजिशियन अभिजित काळे, जनरल फिजिशियन डॉ. कुमुदिनी भोसले, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. तेजस्विनी भोसले, रेडिओलॉजिस्ट डॉ. रश्मी शिंदे.

EECP थेरपी म्हणजे काय?
* ही एक अत्याधुनिक, नॉन-सर्जिकल उपचारपद्धती असून ती हृदयावरील ताण कमी करते
* ऑक्सिजनयुक्त रक्तपुरवठा वाढवते
* नवीन रक्तवाहिन्या (Collateral Circulation) तयार होण्यास मदत करते
* हृदयाची पंपिंग क्षमता सुधारते

कोणासाठी उपयुक्त?
* वारंवार छातीत दुखणे (Angina)
* हृदयातील ब्लॉकेज असलेले रुग्ण
* बायपास/ॲन्जिओप्लास्टी शक्य नसलेले रुग्ण
* हृदयाची कार्यक्षमता कमी असलेले रुग्ण
* हार्ट अटॅकचा धोका असलेले रुग्ण
* वय, डायबेटीस, बीपीमुळे शस्त्रक्रिया धोकादायक असलेले रुग्ण
बायपास किंवा ॲन्जिओप्लास्टी झाल्यानंतरही हा उपचार अत्यंत उपयुक्त!

उपलब्ध सुविधा : आय.सी.यु. केअर- १० बेड, २ डी इको, ट्रेस टेस्ट, अर्धांगवायू (पॅरालायसिस), दुर्बिणीद्वारे पोटाची शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे अ‍ॅपेंडीक्स शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे पित्ताशय काढणे, दुर्बिणीद्वारे हार्नियाची शस्त्रक्रिया

Amartya HOSPITAL
अमर्त्य हॉस्पिटल
सर्जिकल स्पेशालिटी, आय.सीयु. हार्ट ॲण्ड डायबेटिक केअर
पंजाब नॅशनल बँकेच्या शेजारी, सर्जेपुरा रोड, लालटाकी, अहिल्यानगर
संपर्क : 9881007250, ९८८१००७२५०
डॉ. विशाल कल्याण भोसले
MD PHYSICIAN, D CARD(MUMBAI)

भारतातील मिनी स्विट्झर्लंड
बेस्ट ऑफ काश्मिर
₹ 53,000 ६ दिवस
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
9112384842, 9850063432

दर्जेदार व माफक दरात फ्लेक्स प्रिंटींग
9403232323



॥ चतुर्थ पुण्यस्मरण ॥

सुसंस्कार, सुविचारांचा वारसा आमच्या पाठीशी आहे..
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा आजही दरवळत आहे...

**स्व. अशोकशेठ लड्डा**

जन्म दि. ८/२/१९६०
स्व. दि. २३/३/२०२२

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
❀ दुःखांकित ❀
**समस्त लड्डा परिवार**


SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ऑनलाईन ट्रेडिंगमध्ये ३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक; गुन्हा दाखल

नगर - शहरातील बागडपट्टी परिसरात राहणाऱ्या एका खासगी नोकरदाराची ऑनलाईन ट्रेडिंगच्या आमिषाने ३ लाख ५० हजार रूपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संबंधित व्यक्तीने २१ मार्च दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी एका खासगी कंपनीत अकाऊंटंट म्हणून कार्यरत आहेत. ८ मे २०२४ रोजी त्यांना एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून मेघा शर्मा नावाच्या महिलेचा फोन आला. तिने शेअर ट्रेडिंगमध्ये जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांना एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात आले. सदर ग्रुपमध्ये ट्रेडिंगविषयक मार्गदर्शन दिले जात असल्याने दळवी यांनी सुरूवातीला लहान रकमेची गुंतवणूक केली. ॲपवर नफा दिसू लागल्याने त्यांचा विश्वास अधिक दृढ झाला. काही दिवसांनी त्यांना दुसऱ्या ग्रुपमध्ये अॅड करून एक अॅप डाउनलोड करण्यास सांगण्यात आले. यानंतर आरोपींनी विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगितले. त्यानुसार दळवी यांनी जून ते जुलै २०२४ दरम्यान वेगवेगळ्या तारखांना एकूण ३ लाख ५० हजार रुपये संबंधित खात्यांमध्ये जमा केले. अॅपमध्ये नफा दिसत असला तरी प्रत्यक्षात पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता विड्रॉल होत नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री त्यांना झाली.

या घटनेनंतर दळवी यांनी नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर ३ जुलै २०२४ व १६ जुलै २०२४ रोजी स्वतंत्र तक्रारी दाखल केल्या. मात्र त्यांना फसवणुकीच्या रकमेबाबत कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात २१ मार्च रोजी फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा नोंद करून अधिक तपास सुरू केला आहे.

## शेअर ट्रेडिंगमध्ये नफ्याच्या आमिषाने शिक्षकाची १.३१ कोटींची फसवणूक

नगर - शहरातील एका शिक्षकाची ऑनलाईन 'शेअर ट्रेडिंग'च्या आमिषाला बळी पडून तब्बल १ कोटी ३१ लाख ६५ हजार रूपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात संशयित आरोपी महिलेविरूध्द २१ मार्च रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरूकृपा हौसिंग सोसायटी, साताळकर हॉस्पिटलजवळ, अहिल्यानगर येथे राहणाऱ्या ५६ वर्षीय शिक्षकाने फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २५ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांना व्हॉट्सअॅपवर शेअर ट्रेडिंगबाबत जाहिरात प्राप्त झाली. अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत संबंधितांनी त्यांना एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. या ग्रुपमधील अॅडमिन दीपा रसीमाने हिने गुंतवणुकीवर मोठा परतावा मिळवून देण्याचे आश्वासन देत फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांचा विश्वास संपादन केला. तिच्या सांगण्यावरून फिर्यादी, त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी तसेच बहिणीच्या बँक खात्यांतून विविध बँक खात्यांमध्ये वेळोवेळी मोठ्या रकमा ट्रान्सफर करण्यात आल्या.

२७ नोव्हेंबर २०२५ ते १ जानेवारी २०२६ या कालावधीत फिर्यादी यांनी स्वतःच्या खात्यातून सुमारे ७७ लाख ४५ हजार रूपये, मुलाच्या खात्यातून ८ लाख ९० हजार रूपये, मुलीच्या खात्यातून १ लाख ३० हजार रूपये, पत्नीच्या खात्यातून ३० लाख रूपये तसेच बहिणीच्या खात्यातून १४ लाख रूपये अशी एकूण १ कोटी ३१ लाख ६५ हजार रूपयांची रक्कम विविध बँक खात्यांमध्ये जमा केली.

दरम्यान, गुंतवणुकीवर परतावा मिळण्याची वेळ आल्यानंतर आरोपी महिलेने आणखी पैसे भरण्याची मागणी केली. यानंतर संशय आल्याने फिर्यादीने संबंधिताशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क तुटला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवर (हेल्पलाईन १९३०) तक्रार नोंदवली तसेच येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने विविध बँक खात्यांचा वापर करून रक्कम वळवली असल्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरूआहे. पोलीस निरीक्षक सागर ढिकले अधिक तपास करीत आहेत.

अनोळखी व्यक्तींच्या गुंतवणुकीच्या ऑफर्सवर विश्वास ठेवू नका, अधिक नफ्याचे आमिष दाखवणाऱ्या जाहिरातींपासून सावध राहा, कोणतीही रक्कम ट्रान्सफर करण्यापूर्वी खात्री करा, संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित १९३० वर संपर्क साधा, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

## कंपन्यांना पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठा करण्यासाठी नवीन जोडणी तात्काळ देण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश


एमआयडीसीमधील कारखान्यांच्या गॅस टंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत जिल्हाधिकारी पंकज आशिया, महापौर ज्योती गाडे, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, बीपीसीएलचे अधिकारी मनोज जाधव, एचपीसीएलचे व्यवस्थापक ब्रिजेश कुमार आदी.

नगर - औद्योगिक क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या गॅस टंचाईमुळे उद्योगांना पीएनजी गॅस जोडण्या होत नाहीत. गॅस जोडणी करणाऱ्या कंपन्यांकडे असलेली यंत्रणा अपुरी पडत आहे. मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे गॅस जोडणीत अडचणी येत असल्याने, सर्व करारनामे पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. तसेच मराठा चेंबर किंवा औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा सुरू करावी. ज्या उद्योजकांना जोडणी दिली आहे, त्यांना तातडीने गॅस पुरवठा सुरू करावा, असे निर्देश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गॅस कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना दिले.

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात २२ मार्च रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीस महापौर ज्योती गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उद्योजक अनंत देसाई, बीपीसीएलचे अधिकारी मनोज जाधव, एचपीसीएलचे व्यवस्थापक ब्रिजेश कुमार यांच्यासह विविध उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी डॉ. विखे पाटील यांनी औद्योगिक क्षेत्राकरिता आवश्यक असलेल्या गॅस पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेतला व उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या.

केंद्र व राज्य शासनाकडून आलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शैक्षणिक संस्था, वसतिगृहे व औद्योगिक वसाहतींमधील कॅन्टीन यांना वितरित करण्यात येणाऱ्या गॅसची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी सादर केली.

शहरात घरगुती गॅस जोडण्यांचे काम महापालिकेने वाढविलेल्या दरामुळे थांबले असून, याबाबत योग्य मार्ग काढण्याची सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी महापौर ज्योती गाडे व स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांना केली. जागतिक स्तरावरील आव्हानात्मक परिस्थितीत पंतप्रधानांनी केलेल्या उपाय-योजनांमुळे देश खंबीरपणे उभा असल्याचे नमूद करत, उद्योजकांच्या राज्यस्तरीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

औद्योगिक वसाहतींमधील कॅन्टीनसाठी ५० टक्के गॅस उपलब्ध होणार असल्याने कामगारांना दिलासा मिळणार आहे. कामगारांचे स्थलांतर रोखण्यासाठी पाच दिवस काम सुरु ठेवण्याबाबत उद्योजकांनी एकत्रित येऊन निर्णय घ्यावा, यात प्रशासनही आवश्यक ती दक्षता घेईल असे स्पष्ट करण्यात आले. तसेच औद्योगिक वसाहतीमधील सर्व अतिक्रमणे व अवैध व्यवसाय पोलीस प्रशासनाची मदत घेऊन तातडीने निष्कासित करण्याची कार्यवाही प्रादेशिक अधिकाऱ्यांनी करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. यावेळी अरविंद पारगावकर, राजेंद्र कटारिया, प्रवीण बजाज, दिलीप अकोलकर, दौलत शिंदे, चिन्मय सुखटणकर, महेश इंदानी, सुनील कानवडे, राजेंद्र शुक्रे, तेजस इंगळे, सुहास भिंगारे, पुरुषोत्तम नावंदर, मयूर गवळी, नागराज बडगिरी, प्रवीण बोरले, रोहन गांधी, प्रवीण जुंदरे, विकास पानसंबळ, दिनेश अग्रवाल, उदय खिलारी, सुनील रामदासी आदी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक अनंत देसाई यांनी केले. सूत्रसंचालन संजय बंदेष्टी यांनी केले.

एमआयडीसीतील १५० ते २०० कंपन्यांना नियमित गॅस पुरवठा लागतो. इतर काही कंपन्यांना कमी प्रमाणात गॅस लागतो. आजपासून पीएनजी गॅस जोडणीसाठी कंपन्यांचे अर्ज भरुन घेण्याचे काम तातडीने सुरु झाले आहे. आवश्यक यंत्रणा उभी करुन गॅस जोडणी करणाऱ्या कंपनीने काम वेगात सुरु केले आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्र पुन्हा सुरळीत सुरु होईल, अशी आशा निर्माण झाली आहे, असे आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी सांगितले.

## कल्पना आडेप यांचे दु:खद निधन



नगर - दिल्लीगेट येथील सातभाई मळ्यातील रहिवासी कल्पना लक्ष्मण आडेप (वय ५०) यांचे २२ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २३ मार्च रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सॉफ्टवेअरचा 'सोर्स कोड' चोरून बँकेला विकला; ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - सॉफ्टवेअर कंपनीचा गोपनीय 'सोर्स कोड' आणि तांत्रिक माहिती चोरून तिची बनावट प्रतिकृती तयार करून बँक ऑफ महाराष्ट्रला विकल्याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन गोपालदास भराडीया यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.


या प्रकरणात सॉफ्टमेट सिस्टीम्स एलएलपी कंपनीचे मालक मंदार पाथरीकर आणि शैला केदार यांच्यासह कंपनीचे माजी कर्मचारी मुकुंद दायमा, जालींदर गमे, योगेश चव्हाण आणि चैतन्य दिलीप जोशी यांना आरोपी करण्यात आले आहे. आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या कंपनीचा कॉपीराईट असलेला डेटा, युजर इंटरफेस आणि प्रोसेस फ्लो चोरल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी कर्मचाऱ्यांनी कंपनीतील गोपनीय माहितीचा वापर करून मूळ प्रणालीसारखीच हुबेहूब बनावट प्रणाली विकसित केली. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांनी ही प्रणाली बँकेला विकून कंपनीची फसवणूक केली. पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस स्टेशनचे निरीक्षक सागर ढिकले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

या घटनेमुळे तांत्रिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## पुरुषोत्तम पिंपरकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पद्मानगर पाईपलाईन रोड येथील पुरुषोत्तम छबूराव पिंपरकर (वय ७६) यांचे २२ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. स्वामी जनरेटरचे संतोष पिंपरकर व बागडपट्टी येथील स्वामी इलेक्ट्रीकल्स्चे प्रकाश पिंपरकर यांचे ते वडील होत.



## देवीदास सुसे यांचे अल्प आजाराने निधन




भिंगार - येथील द्वारकाधीश कॉलनीतील रहिवासी देवीदास मच्छिंद्र सुसे (वय ४३) यांचे २३ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, १ भाऊ, १ बहीण, भावजय असा परिवार आहे. अॅड. महेश मच्छिंद्र सुसे यांचे ते मोठे बंधू होत.

## मंगलबाई मेहेर यांचे संथारा व्रतात निधन

नगर - बोल्हेगाव फाटा येथील रहिवासी श्रीमती मंगलबाई केवळचंद मेहेर (वय ७२) यांचे २१ मार्च रोजी संथारा व्रतात निधन झाले. २२ मार्च रोजी त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आशिष केवळचंद मेहेर, सौ. अर्चना महावीर भंडारी यांच्या त्या मातोश्री होत.



## विठ्ठल येमूल यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पद्मानगर पाईपलाईन रोड येथील रहिवासी विठ्ठल कोमरय्या येमूल (वय ६५) यांचे २३ मार्च रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## चंद्रकलाबाई बांठीया यांचे संथाराव्रतात निधन

पनवेल - पनवेल येथील रहिवासी श्रीमती चंद्रकलाबाई अशोक बांठीया (वय ७३) यांचे २३ मार्च रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पनवेल येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकलाबाई या स्व. नारायणदास लोढा यांची मुलगी तर सतिश (बाबूशेठ) व संजय लोढा यांच्या बहीण, सचिन बांठीया यांच्या मातोश्री तर मनोज, डॉ. निलेश, मिलेश यांच्या त्या वहिनी होत.

## ईश्वर गव्हाणे यांचे निधन

आष्टी - तालुक्यातील ज्येष्ठ नेते, जुन्या पिढीतील पैलवान, वारकरी संप्रदायाचे पाईक, भारुड सम्राट, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती हभप ईश्वर रामभाऊ गव्हाणे (वय ७८, रा. बोरोडी ता. आष्टी, जि. बीड) यांचे २० मार्च रोजी पहाटे अहिल्यानगर येथे रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी बोरोडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. मिरजगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हेडकॉन्स्टेबल बापूराव गव्हाणे, माजी सरपंच प्रमोद गव्हाणे, भाजपाचे लोणी गटाचे युवा नेते जयसिंग गव्हाणे, बोरोडीचे सरपंच बाळासाहेब गव्हाणे यांचे ते वडील होत.



ईश्वर गव्हाणे हे आण्णा नावाने सर्वत्र परिचित होते. कुस्ती क्षेत्रात त्यांचे मोठे नाव होते. अहिल्यानगर, बीड, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे जिल्ह्यात त्यांच्या नावाचा दबदबा होता. कर्जत श्रीगोंदा, पारनेर, आष्टी, जामखेड या तालुक्यामधील प्रत्येक गावामध्ये हगाम्यात अण्णांची कुस्ती झाली होती. सलग पंधरा वर्ष ते गावचे सरपंच राहिले. त्या काळामध्ये आमदार भीमराव धोंडे यांचे अत्यंत जवळचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पद ही त्यांनी भूषविले. राजकारणाबरोबरच वारकरी संप्रदायातही अण्णांचा चांगलाच वावर होता. आषाढी दिंडी सोहळा, आळंदी दिंडी सोहळा, नाथ षष्ठी सोहळा अशा सर्व सोहळ्यामध्ये अण्णा अग्रेसर होते. भारुड हा कलाप्रकार त्यांनी गावोगाव पोहोचविला. चार ते पाच तालुक्यामधील गावांमध्ये सप्ताहात अण्णांनी नाथांचे भारुड सादर केले म्हणून त्यांना भारुड सम्राट असे म्हटले जायचे. रामायण सांगण्यात त्यांचा हातखंडा होता. लक्ष्मणाला शक्ती लागली हा प्रसंग सांगताना संपूर्ण श्रोत्यांना रडू कोसळत होते, अशी ओघवती शैली अण्णांची होती. त्यांची संत शिरोमणी शेख मोहम्मद महाराज यांच्यावर नितांत श्रद्धा होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## अहिल्यानगरमधील तरुणाने केली ओल्या कचऱ्यापासून गॅसची निर्मिती

### कचरामुक्तीसह ऊर्जानिर्मितीची 'अभिनव' प्रयोग; ७० टक्क्यांपर्यंत एलपीजी गॅसची बचत शक्य


सावेडीतील प्रशांत दरेकर यांच्या घरी जावून कचऱ्यापासून गॅस निर्मिती प्रकल्पाबाबत चर्चा करताना महापालिका आयुक्त यशवंत डांगे.

नगर - जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे व्यावसायिक गॅस पुरवठा विस्कळित झाला असून हॉटेल व्यावसायिक आणि उद्योजक चिंतेत सापडले आहेत. अशा परिस्थितीत सावेडी येथील प्रशांत दरेकर या तरुणाने ओल्या कचऱ्यापासून गॅस निर्मितीचा 'अभिनव' आणि पर्यावरणपूरक प्रयोग यशस्वी केला आहे. या उपक्रमामुळे एकाच वेळी गॅस टंचाई आणि कचरा व्यवस्थापन अशा दोन्ही समस्यांवर मात होणार आहे.

याबाबत माहिती देताना प्रशांत दरेकर म्हणाले, आम्ही घरीच उभारलेल्या या बायोगॅस प्रकल्पामध्ये दररोज जमा होणाऱ्या ओल्या कचऱ्याचा शास्त्रशुद्ध पद्धतीने निचरा केला जातो आणि त्या प्रक्रियेतून थेट स्वयंपाकाचा गॅस मिळवला जातो. घरोघरी दुर्गंधी पसरवणारा ओल्या कचऱ्यावर अशा पद्धतीने प्रक्रिया केली तर त्यापासून गॅस मिळवता येतो. गोबर गॅसप्रमाणेच हा गॅस तयार केला जातो. त्यासाठी घराजवळच एक टाकी तयार केली आहे. घरात तयार होणारा ओला कचरा त्या बायोटँकमध्ये टाकला जातो. त्याचे बॅक्टेरियापासून विघटन केले जाते. या विघटनातून गॅस तयार होतो. हा गॅस पाईपद्वारे घरातील शेगडीला जोडला जातो. दररोज साधारणपणे ४० ते ७५ मिनिटे चालेल इतका गॅस या बायोटँकमधून तयार होतो. यातून ७० टक्के गॅस वाचणार असल्याचा दावा दरेकर यांनी केला आहे.

दरम्यान महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी नुकतीच दरेकर यांच्या ओल्या कचऱ्यापासून गॅस निर्मिती प्रकल्पाला भेट दिली. यावेळी डांगे म्हणाले, शहरात कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही प्रशासनापुढील एक सर्वात मोठी समस्या असते. परंतु अशा प्रकारच्या कचऱ्यातून गॅस निर्मितीच्या उपक्रमांमुळे एलपीजी गॅसची मोठी बचत तर होईलच, शिवाय कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्नही सुटेल. कचरामुक्त व ऊर्जासंपन्न अहिल्यानगर बनवण्याच्या दृष्टीने दरेकर यांचा हा घरगुती प्रकल्प अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचे पाऊल ठरेल.

तसेच, सर्वसामान्य नागरिकांसाठी हा एक अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. ज्यांना शक्य आहे अशा सर्व नागरिकांनी आपल्या घरी हा प्रकल्प राबवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयुक्त डांगे यांनी केले.

## आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील अकोळनेर शिवारात वीज चोरीविरोधात करण्यात आलेल्या कारवाईत विजेच्या खांबावर आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्यावर भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वीज वितरण कंपनीच्या सारोळा कासार शाखा कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता संदीप विठ्ठल बराट (वय ४३, रा.देहरे, ता.नगर) यांनी फिर्यादी दिली आहे. फिर्यादी अभियंता बराट यांच्या सह वीज कर्मचारी राहुल थोरवे, दत्तात्रय सातपुते हे पंच ऋषिकेश एकशिंगे व नितीन लवांडे यांच्या सोबत १२ मार्च रोजी दुपारी अकोळनेर परिसरात वीज चोरी शोधत असताना विलास संपत जाधव (रा. अकोळनेर) यांनी त्यांच्या घराजवळील विजेच्या खांबावर आकडा टाकून सुमारे १० फूट लांबीची केबल जोडून अनधिकृत वीज पुरवठा घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले. विलास जाधव यांनी गेल्या वर्षभरात सुमारे १९ हजार ४३ रुपये किंमतीची ९९२ युनिट वीज चोरी केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## नगरमध्ये ७८ लाख रुपयांच्या कापडाची लावली परस्पर विल्हेवाट

### ट्रकचालक व क्लिनरने केला कंपनीचा विश्वासघात, गुन्हा दाखल

नगर - येथील केडगाव बायपास परिसरात एका मालवाहू ट्रकमधून सुमारे ७८ लाख ८२ हजार १८४ रुपये किमतीच्या कापडाच्या रोलची चोरी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी 'एसटीएस ट्रान्सलॉग सोल्युशन' कंपनीचे व्यवस्थापक अमरीशकुमार ओमप्रकाश गुप्ता यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, चालक आणि क्लिनर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'एसटीएस ट्रान्सलॉग सोल्युशन' कंपनीने अहमदाबाद येथून बेंगलोरला कापडाचे ५५५ रोल घेऊन पाठविलेला ट्रक (क्र. जीजे २७ एक्स ५९३५) नगरमध्ये केडगाव बायपासला संशयास्पद स्थितीत उभा असल्याचे आढळले. कंपनीचा दुसरा चालक सीताराम याने गाडीचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून मालकाला माहिती दिली. कंपनीचे व्यवस्थापक अमरीशकुमार गुप्ता यांनी नगरला येवून प्रत्यक्ष पाहणी केली असता ट्रक मधील ५५५ पैकी तब्बल ४७० कापडाचे रोल गायब असल्याचे दिसले.

या गुन्ह्यात गाडीचा चालक संजय लिलाधर कुमार आणि क्लिनर लिलु मिना ऊर्फ नंदलाल मिना (दोघेही रा. राजस्थान) यांनी संगनमत करून कंपनीचा विश्वासघात केला आहे. आर्थिक फायद्यासाठी त्यांनी या मालाची परस्पर विल्हेवाट लावली असून सध्या दोघांचेही मोबाईल बंद आहेत.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.





## हनुमान चालिसा पाठ

**मंगळवार दि. २४/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**स्वामी विवेकानंद मित्र मंडळ,** स्वामी विवेकानंद चौक, शनि गल्ली, नरेंद्र कुलकर्णी ९८२२७७११९९

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**अशोक दत्तात्रय शहापुरे,** श्री राम मंदीर, पंचवटीनगर, भिस्तबाग चौक, अशोक शहापुरे ९४२०९५०९१५

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**श्री. स्काय ब्रीज सोसायटी,** बुरुडगाव रोड, ९३२५१०२३८३

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**गौरव अनिल कांबळे परिवार,** गोकुळनगर, गजराज फॅक्टरी मागे, भिस्तबाग नाका

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री प्रारंभ युवा प्रतिष्ठान,** सार्थक मुर्तडकर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, महादेव मंदिर ७०८३९१९९९९

# गृहिणी

## आरोग्य

### आवळा खाण्याचे लाभ

आवळा, ज्याला इंडियन गुसबेरी म्हणूनही ओळखले जाते, हे आरोग्यासाठी एक अद्भुत फळ आहे. आयुर्वेदात, ते व्यापक औषध मानले जाते कारण त्यातील पोषक तत्वे केवळ शरीराला आतून निरोगी ठेवत नाहीत तर आपल्या त्वचेला, केसांना आणि डोळ्यांना देखील फायदेशीर ठरतात. जर तुम्ही दररोज एक आवळा खाल्ला तर तुम्हाला फक्त १५-२० दिवसांत त्याचे आश्चर्यकारक फायदे दिसू लागतील. त्याच्या सेवनाने तुमच्या दृष्टी, केस आणि त्वचेतही सकारात्मक बदल होतील. आवळा व्हिटॅमिन सी ने समृद्ध आहे, जो मजबूत आणि निरोगी केसांसाठी आवश्यक आहे. ते केसांच्या मुळांना पोषण देते, केस गळणे कमी करते आणि नवीन केसांची वाढ वाढवते. दररोज आवळा खाल्ल्याने केसांची चमक वाढते, ज्यामुळे ते मऊ आणि जाड होतात. आवळा खाणे त्वचेसाठी देखील अत्यंत फायदेशीर आहे. त्याचे अँटीऑक्सिडंट गुणधर्म त्वचेला आतून पोषण देतात आणि सुरकुत्या आणि काळे डाग कमी करण्यास मदत करतात. ते त्वचेला थंडी आणि उष्णतेच्या प्रभावापासून संरक्षण करते, यामुळे निस्तेज त्वचेपासून देखील आराम मिळतो.

## पाककला

### खजूर ओटस् कुकीज

**साहित्य :** खजूर प्युरी १२० ग्रॅम, ओट्स १०० ग्रॅम, बेकिंग पावडर १/८ चमचा, डार्क चॉकलेट ३० ग्रॅम,

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात खजूर प्युरी, ओटस्, बेकिंग पावडर आणि डार्क चॉकलेट एकत्र करा आणि चांगले मिसळा. मिश्रण बटरने झाकलेल्या बेकिंग ट्रेमध्ये हलवा आणि हाताने कुकीज बनवा. ओव्हन १८० अंश सेल्सिअस वर गरम करा आणि कुकीज १०-१५ मिनिटे बेक करा. ओव्हनमधून काढा आणि कुकीज थोडे थंड होऊ द्या. चला तर तयार आहे पौष्टिक असे खजूर ओट्स कुकीज

## वास्तू

### वैवाहित जीवनासंबंधी

✻ लग्न जमण्यात अडथळा येत असेल तर ६ कापूरचे तुकडे आणि ३६ लवंगा घ्या. आता त्यात हळद आणि तांदूळ घालून देवी दुर्गाला अर्पण करा. असे मानले जाते की असे केल्याने लग्न लवकर होते.

✻ जर कुटुंबातील कोणताही सदस्य आजारी असेल, तर दररोज संध्याकाळी घरात कापूर जाळावा. असे केल्याने घरात असलेली नकारात्मक ऊर्जा संपते आणि रोग नष्ट होतात.

✻ जर तुम्हाला तुमच्या जीवन साथीदारासोबत वैमनस्य असेल तर बेडरूमम ध्ये कापूरच्या गोळ्या घेऊन झोपा. हा उपाय केल्याने तुमच्या जोडीदाराशी तुमचे नाते मधुर होईल.

## सौंदर्य

✻ टोमॅटोचा गर, चिमूटभर हळद, अर्धा चमचा लिंबाचा रस आणि थोडे बेसन एकत्र करा. ही पेस्ट तासभर चेहऱ्याला लावल्याने चेहरा उजळतो.

✻ गुलाब जल तुमच्या चेहऱ्याला टोन करून पोषण देते. गुलाब जल दुधामध्ये मिक्स करून चेहऱ्याला लावा.

✻ ओठ फुटून रक्त येत असेल तर तुपा बरोबर कोकम तेलाचा अर्क वापरावा.

## सल्ला

महिलेला गिफ्ट देण्यासाठी नेकलेस, स्क्रिप्ट नेमप्लेट पेंडंट किंवा इनिशियल्स असलेली ब्रेसलेट/रिंग द्या जे स्टायलिश तर आहेच, पण खास बनवलेलं असल्याने अर्थपूर्णही होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २४ मार्च २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, रोहिणी ११।०५, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. २५ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**वृषभ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**मिथुन :** ठरविलेले काम पूर्ण करण्यासाठी काही प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा.

**कर्क :** निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. देवाण-घेवाण टाळा.

**सिंह :** आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल.

**कन्या :** अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. चांगले भोजन मिळेल.

**तूळ :** बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा.

**वृश्चिक :** सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल.

**धनु :** हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो. कोणाला संताप येईल कोणी दुखावले जाईल असे बोलू नका.

**मकर :** आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या.

**कुंभ :** आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल.

**मीन :** आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७३९३ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | ९ | | | |
| १० | | ■ | ११ | | | ■ | |
| | ■ | १२ | ■ | १३ | | ■ | ■ |
| ■ | १४ | | १५ | ■ | ■ | १६ | १७ |
| १८ | | | | ■ | १९ | | |
| ■ | | ■ | २० | | | ■ | |
| २१ | | | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द :-** १) दीर्घायुषी; अमर ४) मत्सर; द्वेष; हेवा ७) मस्ती; जोर ८) खमंग; मसालेदार १०) सर्पाने टाकलेली त्वचा ११) मोठे गाव; शहर १३) लढाई; लढाईचे मैदान; वाळवंट १४) विष्णूचा तिसरा अवतार १६) पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र १८) घोंगडी तयार करणारा एक समाज; मेंढपाळ १९) एक प्रकारचा दगड २०) केस काळे करण्याचे रसायन २१) काडीमोड; सोडचिठ्ठी; घटस्फोट २२) उतरण; ढाळ; कडपा; टेकडी

**उभे शब्द :-** १) दीर्घ काळपर्यंत; जास्त काळ टिकणारे २) मौज; मजा; आनंद ३) आधारभूत वाक्य; प्रतिज्ञा; भाषण ४) वर्तन; चाल; वागणूक ५) अल्प; थोडे ६) एक विषम संख्या ९) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; नक्र १२) फुलातील रजःकण १४) जंगलात राहणारे (प्राणी वगैरे) १५) विरोध; प्रतिकूल वर्तन; अडथळा १६) मग्न; रममाण; लीन; गुंग १७) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना १९) कपडा; वस्त्र; वसन

### शब्दगंध क्र. ७३९२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टि | पू | सु | ल | ता | न | ■ | व |
| का | त | ळ | ■ | ब | र | ग | डी |
| व | ■ | का | व | ड | ■ | ■ | ल |
| ■ | स | ■ | ■ | तो | क | डा | ■ |
| म | ल | ■ | अं | ब | र | ■ | क |
| द | ग | द | ग | ■ | न | का | र |
| र | ■ | म | ■ | धा | क | व | त |
| सा | व | ट | ■ | फा | र | ■ | ल |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** गुरु कधीही करावे लागत नाहीत आपल्यातील शिष्य सदैव जागा होणं गरजेचं असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### डी.एन,ए. टेस्ट कशी केली जाते?

डीएनए टेस्ट बाबत तुम्ही ऐकले किंवा वाचले असेल. पण डीएनए टेस्ट म्हणजे नेमकं काय? या टेस्टसाठी शरीराचा कोणता अवयव महत्त्वाचा असतो आणि टेस्टचा रिपोर्ट किती दिवसांत येतो? डीएनए टेस्टबाबत आपण अनेकदा ऐकलं असेल. सिनेमा, टीव्ही सिरिअल किंवा वर्तमानपत्रातील बातम्यांमध्ये याचा उल्लेख तुम्ही पाहिला असेल. अनेकदा हत्येसारख्या गुंतागुंतीच्या प्रकरणांची उकल करण्यासाठी डीएनए टेस्ट करण्यात येते. डीएनए टेस्ट वेळखाऊ प्रक्रिया असली तरी ती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. १९८४ मध्ये पहिल्यांदा डीएनए संदर्भात उल्लेख झाला. यानंतर हळूहळू याची लोकप्रियता वाढली. वैद्यकीय चाचणीच्या बाबतीत ही चाचणी अतिशय चांगली आणि नवीन तंत्रज्ञान असल्याचं बोललं जातं. शास्त्रज्ञ लालजी सिंह यांना भारतातील डीएनए चाचणीचे जनक मानले जाते. त्यांनी डीएनएच्या संबंधित क्षेत्रात खूप काम केले आहे. डीएनए टेस्ट साठी कोणत्या गोष्टींचा वापर?

डीएनए टेस्ट किंवा चाचणी करण्यासाठी आपण मानवी शरीरातील रक्त, लाळ, थुंकी, नखे, केस, दात, हाडे, मूत्र आणि वीर्य यांच्या नमुन्यांचा वापर करू शकतो. गुन्ह्याची उकल करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचे हातमोजे, कपडे, उपकरणे, शस्त्रे, साधने, टोपी, लैंगिक अत्याचाराच्या पुराव्याचे किट, अंतर्वस्त्र, कप, बाटली, सिगारेटचे बड्स, टूथपिक, टूथब्रश, बिछाना, गलिच्छ कपडे, कापलेली नखे यावरून कोणत्याही व्यक्तीचा डीएनए चाचणीसाठी नमुना गोळा केला जाऊ शकतो. चेहरा पुसून फेकलेला रुमाल, चष्मा यासारख्या वस्तूंवरुन सुद्धा नमुना गोळा करता येऊ शकतो.

जिवंत व्यक्तींचा डीएनए घेण्यासाठी डॉक्टर त्यांच्या तोंडातील लाळ गोळा करतात आणि एका किटमध्ये ठेवतात. दुसऱ्या पद्धतीत रक्ताचा नमुना घेतला जातो आणि मग प्रयोगशाळेत त्याचे विश्लेषण केले जाते. न जन्मलेल्या बाळाची सुद्धा डीएनए टेस्ट केली जाते. डीएनए म्हणजे डीऑक्सीरायबो न्यूक्लिक ॲसिड (Deoxyribo Nucleric cid). ही अशी टेस्ट असते जी आपले पूर्वज किंवा आपल्या वंशाबाबत अगदी अचूक माहिती देते. आपल्या शरीरात लाखो पेशी असतात. लाल रक्तपेशी वगळता इतर सर्व पेशींचे अनुवांशिक कोडिंग असते जे शरीर बनवते आणि हे डीएनए असते.

डीएनए टेस्ट रिपोर्ट किती दिवसांत मिळतो?

मृत व्यक्तीया डीएनए टेस्टचा रिपोर्ट येण्यासाठी किमान दोन आठवडे लागतात. सामान्यत: डीएनए टेस्टच्या पूर्ण तपासणीसाठी वेळ लागतो. याला जवळपास १० ते २५ दिवस सुद्धा लागू शकतात.

### घुबडाचा राज्याभिषेक

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका घनदाट जंगलात अनेक पक्षी वास्तव्य करीत होते. तसेच कावळे आणि घुबड यांच्यातील वैर खूप जुने आहे. तसेच त्या घनदाट जंगलात एकदा पक्ष्यांनी एक बैठक घेतली आणि घुबडाला राजा बनवण्याचा प्रस्ताव मांडला. आता हे ऐकून घुबडाला मोठा आनंद झाला.

तसेच राज्याभिषेकाच्या आधी पक्ष्यांनी दोनदा घोषणा केली होती की घुबड त्यांचा राजा आहे. व जेव्हा ते तिसऱ्यांदा घोषणा करणार होते, तेव्हा कावळ्यानं ओरडून त्यांच्या घोषणेला विरोध केला आणि म्हणाला की अशा पक्ष्याला राजा का बनवले जात आहे ज्याचा स्वभाव रागीट आहे आणि ज्याच्या एका वाईट नजरेने लोक गरम भांड्यातल्या तीळासारखे फुटतील. घुबडाला कावळ्याचा हा विरोध सहन झाला नाही आणि त्याच वेळी त्याने त्याला मारण्यासाठी त्याच्यावर झडप घातली आणि त्याच्या मागे धावू लागला. कावळा कसाबसा आपला जीव वाचवत उडून गेला.

आता मात्र पक्ष्यांनाही वाटले की घुबड राजा होण्यास योग्य नाही कारण तो त्याचा राग नियंत्रित करू शकत नव्हता. म्हणून सर्व पक्षांनी हंसाला त्यांचा राजा बनवले. व हंसाच्या राज्यात सारेजण आनंदात राहू लागले. तसेच घुबड आणि कावळ्यांमधील शत्रुत्व तेव्हापासून आजही कायम आहे.

तात्पर्य : नेहमी क्रोधावर नियंत्रण ठेवावे नाहीतर नुकसान आपलेच होते.

## जीवन का अमृत (भाग १)



चिकित्सकों ने पाया कि वह कुछ घंटे पहले, बिना किसी मुश्किल के, जा चुका था।

तो ऐसा हैं उस गुरु-सत्ता का अपने प्रिय बच्चों को दिया गया संरक्षण, कि वे इस भौतिक संसार को पूर्णतया संतुष्ट होकर छोड़ सकते हैं, क्योंकि उनको परलोक में पूर्ण संरक्षण मिल चुका होता है।

✻✻✻

८६. मुझे यह जानकर खुशी हुई कि आपकी आत्मा को ज्यादा शांति तब मिलती है, जब आप भजन सिमरन करते हैं और यह कि आप सदा ज्योति में सतगुरु का मुस्कराता हुआ चेहरा देखते हैं और सतगुरु सावन सिंह जी की बड़ी आँख भी देखते हैं, जो कि बहुत शांति, आराम और आनंद का स्त्रोत होती है। कृपया आध्यत्मिक अभ्यासों में और अधिक

### काशिश करें

समय देने की कोशिश करें और जब आप अंतर में सतगुरु के स्वरूप को देखें, तो उसमें पूरी तरह खो जाएँ, इतना कि अपने आप को पूरी तरह भूल जाएँ। इससे ग्रहणशीलता बढ़ेगी और सतगुरु आपसे बातें करेगा, जैसे वह बाहर करता है ।

✻✻✻

८७. कोई भी पुर्ण संत कभी असफल नहीं हुआ। उसके शिष्य इस बात को अच्छी तरह जानते हैं। यह भी (अपनी ओर इशारा करते हुए) आपको निराश नहीं करेगा। इस सौभाग्य के बारे में अच्छी तरह सोच लें। आपको एक दिव्य वरदान दे दिया गया हैं। सतगुरु शरीर नहीं, वह शरीर में काम करती हुई शक्ति हैं और वह अपने शरीर के द्वारा इंसान को समझाता है और उसका मार्गदर्शन करता है।

मिटाया नहीं जा सकता, उसे सतगुरु की दया से, खुशी-खुशी सह लेना चाहिए।

१. यह पुराने कर्मों का फल है कि दो अलग-अलग स्वभाव के इंसान शादी के पवित्र बंधन में बँध जाते हैं, ताकि उनका आपसी 'लेना-देना' समाप्त हो सके। एक दूसरे के विचारों की कद्र करते हुए, यह कोशिश करनी चाहिए कि जीवन शांतिपूर्वक चल सके। प्रेम, नम्रता, धैर्य और विश्वास से बहुत सारी परेशानियाँ दूर हो जाती हैं।

२. आपने यह मानना शुरू कर दिया है कि जीवन में घटनाएँ अलौकिक योजना के अनुसार होती हैं। यह योजना सीधे हमारे अपने कर्मों का ही फल होती हैं। इसलिए इस बात पर जोर दिया जाता है कि हम प्रेम और नम्रता के साथ व्यवहार करें, ताकि प्रालब्ध कर्मों के साथ-साथ, अन्य कर्मों का फल भी सही प्रकार से मिल सके। भुगतान के

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : हो, अगदी असंच होईल. पण चित्रपटात आपण नेहमी बघतो की, चित्रपटातील प्रमुख पात्र ङ्कजशास तसंङ्क या धोरणाचा अवलंब करतो तेव्हाच तो नायक ठरतो. संपूर्ण जगाचा त्यावरच विश्वास आहे. म्हणजे आपण सगळेच आपले मूळ गुण विसरलो आहोत, असा याचा अर्थ होतो का?

शिवानीदीदी : आपण इतरांबद्दल न बोलता फक्त स्वतःकडे लक्ष देऊ या. आपल्या आजूबाजूच्या परिस्थितींतून आपण जे शिकलो त्या आधारावरच काही विशिष्ट पदार्थांचा आपण वापर करत होतो. ह्यातून आपल्याला काय मिळालं? तुम्ही म्हणाला की, आज आपण प्रेमाची भीक मागतोय.

समजा, तुम्ही लहानपणापासून खूप तिखट आणि पचायला जड असं अन्न खात आलात. कदाचित ही तुमची चूक नसेलही. सगळेच असं अन्न खात होते, म्हणून तुम्हीही खात होता. पण

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

आज तुम्हाला त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम दिसतोय जसं शरीरातील कोलेस्टेरॉल वाढणं, हार्टम ध्ये ब्लॉकेज येणं किंवा लिव्हर खराब होणं... अशा प्रकारे तुम्हाला माहीत आहे की आता स्वतःत बदल करायची वेळ आली आहे. गेली पन्नास वर्षं तुम्ही विशिष्ट प्रकारचाच आहार घेतला पण आता इथून पुढे तुम्ही त्यात बदल करणार नाही का?

सुरेश ओबेरॉय : नक्कीच. 'आता बदलण्याची वेळ आली आहे' हा विचार मला आवडला. आपली विचारसरणी बदलायची वेळ आली आहे. याआधीच्या माझ्या प्रश्नात मी माझ्या परिस्थितीसाठी जगाला दोष देत होतो.

शिवानीदीदी : आता आपण परिणाम बघितला आहे - जुन्या आहार पद्धतीने आपलं शरीर आजारी पडतंय. आपण इतरांकडे लक्ष देण्याची गरज नाही. कारण तिखट खाण्यामुळे आजारी पडलेली आणि तरीही तीच आहारपद्धती सुरू ठेवून, त्यात आम्ही बदल करू शकत नाही असं जाहीर करणारे लोक आपल्याला सापडतील.

सुरेश ओबेरॉय : हो, कॅन्सरग्रस्त असूनही अनेक जण तंबाखूचं सेवन करतात. शिवानीदीदी : एखाद्या धोकादायक सवयीचे परिणाम माहीत असूनही जर कोणी त्या सवयीत बदल करू शकत नसेल तर याचा अर्थ त्यांचा आत्मा खूप कम कुवत आहे. संताप आणि चिडचिड यांचे संस्कार आपल्याकडे आनुवंशिकतेतून आले की आपण ते आपल्या पालकांकडून, शिक्षकांकडून किंवा भोवतालातून घेतले हे जाणण्यात काहीच अर्थ नाही. ह्या सगळ्याचा वापर केल्याचे परिणाम म्हणजे आपण सतत दुःखी आणि चिंताग्रस्त राहतो,

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

हास्यतरंग : मन्या रोज साखरेचा डब्बा पाहतो आणि झोपतो हे बघून बायको विचारते, रोज तुम्ही साखरेचा डब्बा का चेक करता?
मन्या : डॉक्टरांनी मला रोज शुगर चेक करायला सांगितली आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ बंगालच्या खाडीचा अंतर सरकारी संघटनेचा अध्यक्ष कोणता देश बनला आहे? - भारत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

याचा आवर्जून आस्वाद घ्यावा. कारण जांभळामध्ये लोहतत्त्व जास्त प्रमाणात असल्यामुळे याच्या सेवनामुळे रक्त शुद्ध व लाल होते.

२) पोटदुखी, अपचन, अशुद्ध ढेकर येणे अशा विकारांवर जांभळाचे सरबत प्यावे. जांभूळ हे दीपक, पाचक असल्याने न पचलेले अन्न पचण्यास मदत होते.

३) यकृताची कार्यक्षमता वाढवून रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी सात-आठ जांभळे चार पट पाण्यात भिजत घालून नंतर १५ मिनिटे उकळावीत. त्यानंतर जांभळातील बीसह जांभळाचा पाण्यामध्ये लगदा करावा व हे द्रावण दिवसभरात तीन-चार वेळा प्यावे. यामुळे रक्तातील वाढलेली साखर कमी होते व यकृत कार्यक्षम होऊन विविध आजारांविरुद्ध रोगप्रतिकारक शक्ती तयार होते. ४) गर्भाशयाच्या

### जांभूळ

बीजकोषांना सूज आल्यामुळे अनेक स्त्रियांना वंध्यत्व येऊ शकते. अशा वेळी हा आजार आटोक्यात आणण्यासाठी जांभूळ बी १०० ग्रॅम, मंजिष्ठा ५० ग्रॅम, कारले बी ५० ग्रॅम, अशोका चूर्ण ५० ग्रॅम व सारिवा ५० ग्रॅम या सर्वांचे चूर्ण एकत्र करून सकाळी एक चमचा व रात्री एक चमचा घ्यावे. यामुळे बीजांडकोष सूज (पी.सी.ओ.डी.) हा आजार आटोक्यात येतो.

५) जांभूळ बी व साल ही मधुमेह या आजारावर अत्यंत उपयुक्त आहे. जांभूळ बी १५० ग्रॅम, हळद ५० ग्रॅम, आवळा ५० ग्रॅम, ५० ग्रॅम मिरे, ५० ग्रॅम कडुलिंब पाने, ५० ग्रॅम कारले बी यांचे चूर्ण एकत्र करून सकाळी व संध्याकाळी जेवणानंतर दोन चमचे घ्यावे. यामुळे मधुमेह हा आजार आटोक्यात आणण्यास मदत होते.

६) पोटात येणारा मुरडा व अतिसार थांबण्यासाठी जांभळाची साल स्वच्छ धुऊन पाण्यात उकळावी व हा काढा सकाळी व संध्याकाळी एक कपभर प्यावा. याने पोटात येणारी कळ थांबून जुलाब थांबतात.

७) स्त्रियांमध्ये होणाऱ्या श्वेतप्रदर रोगावर जांभळाच्या सालीचा काढा हा अत्यंत उपयोगी आहे. जांभळाची साल स्तंभनकार्य करीत असल्याने या आजारावर गुणकारी आहे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगरची महावस्त्र परंपरा जपणाऱ्या 'कोहिनूर'चे राम नवमीला ९२ व्या वर्षांत पदार्पण

नगर – अहिल्यानगर शहराला कापड विश्वात ओळख निर्माण निर्माण करून देणारे कोहिनूर वस्त्रदालन राम नवमीला ९२ व्या वर्षांत पदार्पण करत आहे. तब्बल ९ दशके सदा. सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम कपडे उपलब्ध करून देत कोहिनूरने कायम विश्वासार्हता जपली आहे. हीच परंपरा आणि विश्वासामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून लग्न बसता खरेदीसाठी ग्राहक अहिल्यानगरला भेट देत असतात. महाराष्ट्राचे हे वस्त्र वैभव आता रामनवमीच्या मुहूर्तावर नाशिकमध्येही दाखल होत आहे, अशी माहिती अश्विन गांधी यांनी दिली.



अहिल्यानगर येथील माणसंही तितकीच सरळ आणि व्यापारी, व्यावसायिकही तितकेच निर्मळ मनाचे. नगरची ओळख येथील मोठ्या कापडबाजारामुळेही महाराष्ट्रात आहे. ही ओळख निर्माण करण्यात सिंहाचा वाटा आहे तो कोहिनूर वस्त्रदालनाचा. कापडबाजारातील कोहिनूरची बहुमजली संपूर्ण वातानुकुलित इमारत म्हणजे वस्त्रवैभव आहे. सदा सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम हे ब्रीद कोहिनूरच्या चराचरात भिनलेले आहे. त्यामुळेच सर्वोत्तम कपडे खरेदी म्हणजे कोहिनूर असे समीकरणच ग्राहकांच्या मनात रूजले आहे. १९३५ मध्ये कनकमल गांधी यांनी छोटेखानी स्वरुपात कोहिनूरची मुहूर्तमेढ रोवली. ग्राहकांना नेहमीच सर्वोत्कृष्ट गुणवत्ताच द्यायची हे ध्येय ठेवून गांधी यांनी हा व्यवसाय चालवला. पुढे १९६० च्या सुमारास वसंतलाल गांधी यांनी कोहिनूरची धुरा हाती घेतली. काळाची पावले अचूक ओळखत त्यांनी अनेक बदल केले. याव्दारे ग्राहकांना आणखी दर्जेदार सेवा मिळण्यास सुरुवात झाली. वसंतलाल गांधी यांचे चिरंजीव प्रदीप गांधी नवीन संकल्पनांसह कोहिनूरची पताका खांद्यावर घेतली. आधुनिक काळ लक्षात घेवून प्रदीप गांधी यांनी कोहिनूर बहुमजली केले. गारमेंट व कपड्यांचे स्वतंत्र दालन सुरु केले. त्यामुळे ग्राहकांना मनपसंत खरेदी अधिक निवांत वातावरणात करण्यास वाव मिळाला. २००३ ला लंडन येथे एमबीए केल्यानंतर गांधी परिवाराची चौथी पिढी अश्विन गांधी यांच्या रुपाने या व्यवसायात उतरली. जग पाहिलेल्या अश्विन गांधी यांनी नाविन्यपूर्ण संकल्पना व्यवसायात आणल्या. २००७ ला नव्या रुपातील कोहिनूर ग्राहक सेवेत रूजू झाले. लग्न बस्त्यापासून सणासुदीच्या खास खरेदीसाठी स्वतंत्र विभाग सुरु केले. रूमालापासून सुट, शेरवानी तसेच नववधूच्या भरजरी शालूपर्यंत सर्व काही एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने कोहिनूर हे ग्राहकांसाठी वन स्टॉप सोल्युशन बनले. लग्नाचा बस्ता म्हटला की आजही नगरच नव्हे तर शेजारील जिल्ह्यातील ग्राहकही कोहिनूरलाच पहिली पसंती देतात. उत्कृष्ट ग्राहक सेवेची ही वाटचाल कोहिनूर मॉलच्या रूपाने समोर आली आहे. नगरच्या सावेडी रस्त्यावर प्रशस्त अशा कोहिनूर मॉलची उभारणी अश्विन गांधी यांच्या संकल्पनेतून झाली आहे. याठिकाणी परिपूर्ण वस्त्रखरेदीबरोबरच मनोरंजनाचीही रेचलेल आहे.

नगरच्या वैभवात भर घालणारा कोहिनूर मॉल परगावच्या ग्राहकांनाही आपलेसा करत आहे. या प्रदीर्घ वाटचालीत ग्राहकांचे प्रेम, विश्वास आणि कोहिनूरची आपुलकीची सेवा याचा सुरेख संगम सजलेला आहे. तीच परंपरा भविष्यात चालू राहिल अशी ग्वाही गांधी परिवार देत आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आधी बीज एकले

संतसाहित्याचे अनुभवविश्व इतके व्यापक आणि सर्वसमावेशक आहे की मानवी जीवनाच्या वाटेवरील अनेक घटना, प्रसंग, संकल्पना याचे वास्तव प्रतिबिंब हे संतसाहित्यात प्रगटलेले असते. आजच्या साहित्यात मांडलेल्याही अनेक साहित्य संकल्पना कधी दृष्टांताच्या माध्यमातून, कधी रूपकांच्या माध्यमातून तर कधी तत्त्वदर्शनाच्या माध्यमातून, संत साहित्यामधून डोकावताना दिसतात. प्रभात फिल्म कंपनीने संत तुकाराम महाराजांवरील अप्रतिम चित्रपट काढला होता. तो चित्रपट खूप गाजला. त्या चित्रपटात,

***आधि बीज एकले। बीज अंकुरले रोप वाढले ।***

ही रचना तुकोबाराय खूप आर्ततेने गातात. ती रचना इतकी प्रासादिक आहे की चित्रपट पाहिल्यानंतर त्यावेळच्या अनेक व्यासंगी मंडळींनी हा तुकोबारायांचा अभंग गाथेत कुठे आहे का? याचा शोध घ्यायला सुरुवात केली पण गाथेत तो अभंग कुठे सापडेना. एवढी प्रासादिक रचना तुकोबारायांशिवाय कोण करणार? म्हणून हा अभंग तुकोबांचाच आहे की काय यावरही बराच खल झाला. ती रचना शांताराम आठवले यांची होती. संतांच्या अभंगरचनेशी नाते सांगणारी ती रचना ऐकतानाच शांताराम आठवले यांच्या प्रासादिक सर्जनाची आणि उत्तुंग प्रतिभेची साक्ष पटते. या रचनेचे मूळ मला ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायातील एका ओवीत दिसते. ज्ञानदेव म्हणतात,

पाहे हा आरंभी बीज एकले।
मग ते विरूढलिया बुड जाहले ।
बुडी कोंब निघाले। खांदियाचे ।। ज्ञाने १० / ९८

अर्जुना, पहा प्रथम फक्त एक बीज असते. मग त्याला अंकुर फुटतो आणि बुंधा तयार होतो. त्याला अनेक फांद्या फुटतात आणि फांद्यापासून अनेक फाटे फुटून फळे आणि फुले येतात. एकच बीज केवढे विस्तारते! मोठा भव्यदिव्य वृक्ष उभा राहतो. त्याप्रमाणे प्रथम मी एकटाच असतो आणि माझ्यातून या विश्वरुपाचा विस्तीर्ण वृक्ष बहरतो.

शांताराम आठवलेंच्या रचनेतही हीच संकल्पना त्यांनी उभी केली. 'व्यापूनी जगता तूचि अनंता... परि अंती बीज एकले...' असे सांगत परमात्मारूपी बीजच विस्तारत जगाला व्यापून कसे राहिले याचेच काव्यमय चिंतन घडविले.

**– किशोर गांधी**

# विवाह जुळविताना अवाजवी अपेक्षा टाळून, सामंजस्याची भूमिका स्वीकारावी

## भगवान फुलसौंदर यांचे प्रतिपादन, अहिल्यानगरात राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळावा उत्साहात

नगर – बदलत्या सामाजिक रचनेमुळे विवाह जुळविणे ही सर्व समाजासाठी मोठी गरज बनली असून, विभक्त कुटुंब पद्धती, नोकरी-व्यवसाय आणि सोशल नेटवर्किंगमुळे परस्पर भेटीगाठी कमी झाल्याने मुला-मुलींचे विवाह जुळविताना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पालकांनी अवाजवी अपेक्षा न ठेवता सामंजस्याची भूमिका स्वीकारावी, असे आवाहन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले.

रयत प्रतिष्ठान, जय युवा अकॅडमी, जनवार्ता, क्रांती ज्योती बहुउद्देशीय संस्था, समृद्धी बहुउद्देशीय महिला संस्था, सावित्रीबाई फुले महिला संस्था, श्री संत सावता माळी युवक संघ तसेच जागृती बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळाव्याच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.



अहिल्यानगरात राज्यस्तरीय माळी वधू-वर मेळाव्यामध्ये नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शहर बँकेचे व्हा.चेअरमन प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले आदी.

या वेळी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शहर बँकेचे व्हाइस चेअरमन प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, नगरसेविका आशाताई डागवाले, साहेबराव निधाने, दत्ता जाधव, मंगलताई भुजबळ, सारंग पंधाडे, मच्छिंद्र बनकर, प्रा. सिताराम जाधव, ॲड. महेश शिंदे, प्रा. अश्विनी जाधव, ॲड. पोपटराव बनकर, जयश्रीताई शिंदे, स्वाती बनकर, ॲड. दिनेश शिंदे, नितीन डागवाले, दर्शन बनकर, अनंत द्रविड, प्रा. संजय पडोळे, तुषार रणनवरे, रामेश्वर राऊत आदींसह समाजबांधव व महिला उपस्थित होत्या.

यावेळी पुढे बोलताना भगवान फुलसौंदर म्हणाले की, बदलत्या काळानुसार केवळ सरकारी नोकरी करणारा वधू-वर मिळावा या अपेक्षेवर ठाम राहणे योग्य नाही. अनेक तरुण-तरुणी उद्योग-व्यवसायात पुढे जात आहेत. त्यामुळे त्यांच्या स्वभाव, निर्व्यसनी जीवनशैली आणि कुटुंब पार्श्वभूमीचा विचार करून विवाह जुळविणे आवश्यक आहे. लग्न करताना अहंकार बाजूला ठेवून तडजोडीची भूमिका घेणे काळाची गरज बनली आहे. शिक्षण आणि करिअरमुळे विवाहाचे वय वाढत असून, योग्य वेळी विवाह होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात ॲड. महेश शिंदे यांनी सांगितले की, समाजाची गरज ओळखून मागील काही वर्षांपासून हा वधू-वर मेळावा आयोजित केला जात आहे. मागील वर्षात ४५ विवाह जुळविण्यात यश आले असून, यामध्ये अनेकांचे लग्न होऊन संसार स्थिरावले आहेत. या उपक्रमातून समाजातील अनेक कुटुंबांना आधार मिळत असल्याचे समाधान असल्याचे त्यांनी व्यक्त केले.

किशोर डागवाले, बाळासाहेब बोराटे आणि प्रा. माणिक विधाते यांनी या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

दत्ता जाधव यांनी सांगितले की, संस्था केवळ विवाह जुळवून थांबत नाही, तर नवदांपत्यांचे संसार अधिक सक्षम कसे होतील यासाठीही मार्गदर्शन केले जाते. त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठीही विविध उपक्रम राबविले जात असल्याचे स्पष्ट केले.

विवाह जुळविताना येणाऱ्या अडचणी आणि सध्याची सामाजिक परिस्थिती यावर प्रा. संजय पडोळे व मंगलताई भुजबळ यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. पडोळे म्हणाले की, मुला-मुलींच्या अपेक्षा वाढल्याने स्थळ शोधणे कठीण झाले आहे. सरकारी नोकरी, बंगला, चारचाकी, शेती यांसारख्या अपेक्षा रास्त असल्या तरी त्यावर अडून राहणे चुकीचे आहे. छोटे उद्योग-व्यवसाय आणि चांगले कुटुंब यांनाही प्राधान्य दिले पाहिजे.

मंगलताई भुजबळ म्हणाल्या की, शिक्षणानंतर विवाह जुळविणे ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया बनली आहे. वाढत्या अपेक्षांमुळे अनेकांचे विवाह उशिरा होत आहेत. शेतकरी व व्यावसायिक कुटुंबातील मुलांना विशेष अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे भविष्याचा विचार करून योग्य जोडीदार निवडताना समंजसपणा आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

सूत्रसंचालन अनंत द्रविड यांनी केले. ॲड. पोपटराव बनकर यांनी आभार मानले.

### समाजभूषण पुरस्काराचे वितरण

विविध क्षेत्रांमध्ये निस्वार्थपणे सेवा करणाऱ्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये साहेबराव खंडूजी निधाने, संजय शिवाजी मेहेत्रे, पुजा बिभीषण देवळकर (धोंडे) आणि अशोकराव कुंडलीक भालके यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ८ वी, ९ वी आणि १० वी च्या राज्य व सीबीएसई बोर्ड अभ्यासक्रमांसाठी श्री सांदिपनी ॲकॅडमीत विशेष दैनंदिन व वीकेंड फाउंडेशन कोर्सेस सुरू

नगर – सावेडी येथील श्री सांदिपनी ॲकॅडमी विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक यशासाठी सर्वोत्तम संधी उपलब्ध करून देत आहे. ८ वी, ९ वी आणि १० वीच्या राज्य व CBSE बोर्ड अभ्यासक्रमांसाठी विशेष दैनंदिन व वीकेंड फाउंडेशन कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना थेट IIT, NIT आणि अनुभवी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळते. यामध्ये प्रो. नानासाहेब बऱ्हाटे (Physics), डॉ. के. बलराजू (Chemistry) आणि प्रो. राहुल गुजराल (Mathematics) यांचा समावेश आहे.




विद्यार्थ्यांसाठी १० वी उइडए साठी ४५ दिवसीय पॉवर व्हेकेशन बॅच देखील उपलब्ध आहे. ही बॅच १८ मार्च पासून सुरु होईल आणि विद्यार्थ्यांना बोर्ड तसेच स्पर्धात्मक परीक्षा दोन्हीसाठी संपूर्ण तयारी करण्याची संधी देईल. अभ्यासक्रमाचे प्रमुख विषय विज्ञान, गणित, समाजशास्त्र आणि इंग्रजी व्याकरण आहेत.

श्री सांदिपनी ॲकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन, दैनंदिन व वीकेंड बॅचेस, पूर्ण अभ्यासक्रम कव्हरेज, सुपरवायझन व प्रॅक्टिकल सत्रे, अभ्यास साहित्य व नोट्स तसेच शंका निरसन आणि परीक्षा रणनीतीसाठी मार्गदर्शन सत्रे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयावर सखोल समज मिळेल आणि IIT-JEE व इतर स्पर्धात्मक परीक्षांसाठी तयारी करता येईल.

ॲकॅडमीमध्ये व्यक्तिगत शिक्षण पद्धती व फोकससाठी कौन्सलिंग देखील केले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी सोयीस्कर स्थान उपलब्ध आहे, जे IIT-JEE कॅम्पस, एकविरा चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे आहे. ४५ दिवसांत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी संक्षिप्त पण प्रभावी पॉवर बॅचेस चालवल्या जातात.

विद्यार्थ्यांनी आजच आपली कौन्सलिंग बुक करण्यासाठी फॉर्म स्कॅन करून भरावा. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक ७५०१ ९८८ ९८८ किंवा वेबसाइट drbalrajukarri.coac वापरू शकता.

श्री सांदिपनी ॲकॅडमी ही अशी जागा आहे जिथे विद्यार्थी केवळ अभ्यास करत नाहीत, तर भारताचे भविष्यातील टॉपर बनतात.

# नगरचा खेळाडू संकल्प थोरात यांची यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर म्हणून निवड

## आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी

नगर – अथेन्स (ग्रीस) येथे जून महिन्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर सत्रासाठी नगरचा राष्ट्रीय खेळाडू संकल्प थोरात याची निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती व इंटरनॅशनल ऑलिम्पिक अॅकॅडमी यांच्या सहकार्याने ६ ते १८ जुन दरम्यान होणाऱ्या कार्यक्रमात संकल्प थोरात भारतीय ऑलिम्पिक संघटनेचा प्रतिनिधी म्हणून सहभागी होईल. या नियुक्तीचा बहुमान संकल्प थोरात यांच्या रूपाने नगरला पहिल्यांदाच मिळाला आहे.




यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर कार्यक्रम हा जागतिक स्तरावरील शैक्षणिक आणि नेतृत्व विकास कार्यक्रम आहे. त्यांच्यामार्फत देशात ऑलिम्पिक मूल्यांचा प्रसार करणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. त्यात विविध देशांचे क्रीडा क्षेत्रातील युवा प्रतिनिधी सहभागी होतात. त्यांना दोन आठवड्यांच्या सत्रामध्ये ऑलिम्पिकची मूल्ये, क्रीडा क्षेत्रातील नीतिमत्ता आणि नेतृत्व, जागतिक क्रीडा व्यवस्थापन, खेळाच्या माध्यमातून विकास याबाबत मार्गदर्शन केले जाते.

राष्ट्रीय स्तरावरील सायकलपटू व खो-खो स्पर्धेतील पदक विजेता संकल्प थोरात हे शिवछत्रपती पुरस्कारविजेते निर्मलचंद्र थोरात यांचे पुत्र आहेत. संकल्प सध्या टाटा ट्रस्ट्स आणि ज्ञान प्रबोधिनी यांच्या 'ग्रासरूट्स क्रीडाकुल' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात व्यवस्थापक पदावर काम करत आहे.

# पं.दिनदयाळ पतसंस्थेची अनोखी ठेव योजना, ठेवीदारांना मिळणार विमा संरक्षण

नगर – सहकार क्षेत्रातील आदर्श पतसंस्था पुरस्कार प्राप्त पतसंस्था पं. दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेने 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष ठेव योजना' आणली आहे. यात ठेवींवर आरोग्य व अपघात विम्याचा लाभ मिळणार आहे. पतसंस्थेच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारच्या दुहेरी फायद्याच्या योजनेचा शुभारंभ करीत असून त्याचा लाभ नागरिकांनी. घ्यावा असे आवाहन पतसंस्थेचे संस्थापक, चेअरमन वसंत लोढा यांनी केले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त ही ठेव योजना कार्यान्वित करीत असून संस्थेचे नूतन सल्लागार किशोर गांधी यांच्या संकल्पनेतून ही योजना आणली असून ठेवीदारांचे सर्वोत्तम संरक्षण व फायदा देण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.



दीनदयाल उपाध्याय



डॉ. केशव हेडगेवार

किशोर गांधी म्हणाले की, या ठेव योजनेतंर्गत ५० वर्षापर्यंतच्या सर्वांना पंतप्रधान जीवन ज्योती आरोग्य विमा योजना तर ७० वर्षांपर्यंतच्या सर्वांना पंतप्रधान सुरक्षा अपघात विमा योजनेचा लाभ मिळेल.

संस्थेचे सचिव विकास पाथरकर व उपाध्यक्ष सुधीर पगारिया यांनी सांगितले की, सर्वाधिक ९ टक्के पर्यंतच्या व्याजासह विमा संरक्षण पहिल्याच योजनेचा फायदा घेण्याचे सांगितले.

ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे यांनी पतसंस्थेशी अधिक नगरकरांनी व्यवहार करुन विविध ठेव योजना, कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संचालक मंडळाचे सर्व सदस्य, व्यवस्थापक निलेश लाटे, उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर आदी उपस्थित होते. या ठेव योजनेसाठी काही अटी व नियम लागू आहेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी मुख्य शाखा, सावेडी शाखेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्क क्रमांक : ९८५०९९६९९२.

# डॉ.विखे इंजिनीअरींग मेकॅनिकल विभागातील २१ विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे नोकरीसाठी निवड

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागामार्फत मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने मेकॅनिकल इंजिनीअरींग क्षेत्रातील कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष मेकॅनिकल इंजिनीअरींग विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील एकुण २१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

यावेळी मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागातील कु. दिप्ती पानमंद हिचे सीएई एनालायझर, पुणे या मल्टीनॅशनल कंपनीमध्ये निवड झाली. यामध्ये मे, हायटेक, लिस्टारो ग्रुप, पुणे ०४, मे. लॉरेंझ नुडसन, अहिल्यानगर १०, मे.राधेय मशिनरी, पुणे ०९, सीएई एनालायझर प्रा. लि, पुणे-०१, मे.नेलसॉफ्ट प्रा.लि. पुणे-०९ में. सी.पी.एस.प्रा. लि.पुणे ०८, फ्लेअर एनर्जी०१, के ड्राईव्ह सुपा-०२ मे.सी. जी.पॉवरअहिल्यानगर-०२, या मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस प्रत्येकी दोन अशा ४२ ऑफर्स मिळाल्या असून सरासरी तीन ते चार लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज आहे.

या मुलाखतीसाठी विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. दत्तात्रय नन्नवरे, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे यांनी परिश्रम घेतले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. सुशील मगर, प्राचार्य डॉ. रविंद्र नवधर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे, डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या व त्यांच्या या यशाचे कौतुक केले.

# प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून होणे गरजेचे

## मनपा आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन, नगरमधील पहिल्या सीबीएसई मराठी शाळेची घोषणा

नगर – 'अभ्यासातील मूळ संकल्पना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने मुलांना मातृभाषेतून शिक्षण देणे महत्वाचे असते. अशा विचाराने सध्याच्या काळात सीबीएसई मराठी सुरु करण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.', असे प्रतिपादन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



अहिल्यानगरमधील पहिली प्रस्तावित सीबीएसई मराठी शाळा म्हणून 'पालवी शिशुविहार' घोषणा' म-मराठीचा' या सांस्कृतिक तथा बालवर्ग पदवीदान समारंभात करण्यात आली. याप्रसंगी मनपा आयुक्त यशवंत डांगे, ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील आदित्य शिंदे आदी.

अहिल्यानगर मधील पहिली प्रस्तावित सीबीएसई मराठी शाळा म्हणून 'पालवी शिशुविहार' घोषणा, सावेडीमधील शुभमंगल कार्यालय येथे, 'म-मराठीचा' या सांस्कृतिक तथा बालवर्ग पदवीदान समारंभात करण्यात आली. गेले १० वर्षे सुरु असलेल्या पालवी शिशुविहार मधील बालवर्ग पूर्ण करून इयत्ता पहिलीत प्रवेश करणाऱ्या मुलांना येथे पदवी प्रदान करण्यात आली. सदर कार्यक्रमास मनपा आयुक्त यशवंत डांगे, ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील आदित्य शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डांगे म्हणाले 'अभ्यासातील मूळ संकल्पना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने मुलांना मातृभाषेतून शिक्षण देणे महत्वाचे असते. अशा विचाराने सध्याच्या काळात सीबीएसई मराठी सुरु करण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.'

तसेच शिंदे म्हणाले 'सध्याच्या शिक्षण पद्धतीने केवळ यंत्रवत पदवीधारक (डिग्री होल्डर) तयार होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरण अवलंबून चालणाऱ्या, मुलांचे संपूर्ण व्यक्तिमत्व घडवणाऱ्या पालवी शिशुविहार सारख्या शाळांची निश्चितच समाजात आवश्यकता आहे'.

यावेळी व्यासपीठावर अशोक मुथा, राजेंद्र सोनार, शरद झोटिंग, रवींद्र करंदीकर, सदाशिव उपाले, अरुण कुलकर्णी, गंधे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन शाळेच्या मुख्य आचार्या मुग्धा घोटणकर तथा सौ. चिन्मयी यांनी केले. कार्यक्रमाची व्यवस्था अमित मुथा, गणेश झंवर आणि अनिकेत घोटणकर यांनी पाहिली. औपचारिक कार्यक्रमानंतर शाळेतील मुलांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्या सहभागाने सांस्कृतिक कार्यक्रम 'म-मराठीचा' झाला. आजी-माजी तसेच भविष्यातील अनेक पालकांनी या कार्यक्रमास हजेरी लावली.

# सावित्रीबाई फुले विद्यापीठ आयोजित 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२६' स्पर्धेत अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थी उद्धव मनियार याला द्वितीय क्रमांक

### पर्यावरणपूरक 'Revive' स्टार्टअपला मिळाले यश

नगर – बीपीएचई सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयातील बीबीए विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी उद्धव मनियार याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२६' या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्यार्थ्यांमधील उद्योजकता, नवकल्पना आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक येथे आयोजित बूट कॅम्पपासून या स्पर्धेची सुरुवात झाली होती. या स्पर्धेत सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी सादर करण्यात आलेल्या ६३२ संकल्पनांमधून केवळ ५० स्टार्टअप्सना अंतिम 'इन्व्हेस्टमेंट रेडी' टप्प्यासाठी निवड करण्यात आली होती.


सावित्रीबाई फुले विद्यापीठ आयोजित 'स्टार्टअप ऑलिम्पियाड २०२६' स्पर्धेत अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थी उद्धव मनियार याला द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. आर. जे. बार्नबस आदी.

या स्पर्धेत उद्धव मनियार याने 'Revive' या आपल्या स्टार्टअप संकल्पनेसाठी द्वितीय क्रमांक पटकावला. या स्टार्टअपद्वारे प्लास्टिक कचऱ्यापासून पर्यावरणपूरक व टिकाऊ बांधकाम पॅनल तयार करण्याचे अभिनव मॉडेल सादर करण्यात आले. पर्यावरण संरक्षण आणि कचरा व्यवस्थापन या दोन्ही महत्त्वाच्या मुद्यांना स्पर्श करणारी ही संकल्पना परीक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली.

याबद्दल उद्धवला ट्रॉफी तसेच १५,००० रुपयांचे प्री-सीड फंडिंग स्वरूपात पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रकल्पासाठी त्याला बीबीए विभाग प्रमुख डॉ. तुशिता अय्यर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. आर. जे. बार्नबस यांनी उद्धव मनियार याचा सत्कार करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांनी नवकल्पना आणि उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहनही यावेळी केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्रशासकीय समन्वयक डॉ. नागवडे, प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य भालसिंग, नॉन-ग्रँट को-ऑर्डिनेटर डॉ. रज्ञाक तसेच बीबीए विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

उद्धव हा अहिल्यानगर येथील सौ. अर्चना व राहुल मनियार यांचा पुत्र आहे.

# 'इंडियन आयकॉन अ‍ॅवॉर्ड'ने मनोज जरांगे पाटील सन्मानित



नगर – विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या वतीने जालन्यातील आंतरवाली सराटी येथे महाराष्ट्रातील मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांना इंडियन आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

बीड जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेले मनोज जरांगे पाटील हे जालना (अंकुशनगर) येथे राहून मराठा समाजाला 'कुणबी' दाखल्याद्वारे ओबीसी प्रवर्गातून आरक्षणासाठी, तसेच उपोषणाद्वारे सातत्याने संघर्ष करत आहेत. त्यांनी आंदोलनासाठी स्वतःची जमीनही विकली आहे. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे उपोषण करून त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न प्रकर्षाने मांडला. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळावे, ही त्यांची प्रमुख मागणी आहे.

विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे संस्थापक अध्यक्ष व १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते मनोज जरांगे पाटील यांना इंडियन आयकॅन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांचे सहकारी तिरूखे पाटील व ग्लोबल शिवसृष्टी फाउंडेशन या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व लेखक विशाल मंडलिक उपस्थित होते.

# गोरे डेंटल हॉस्पिटल, नगर येथे २५ मार्चला जबड्याच्या व मुख कर्करोग निदान शिबिर

नगर – जबड्याचे, गालाचे तसेच मुख कर्करोगाचे निदान करण्यासाठी व रुग्णांमध्ये कर्करोगासंदर्भात जनजागृती व्हावी, लवकरात लवकर निदान व्हावे या उद्देशाने गोरे डेंटल हॉस्पिटल, डॉ. आंबेडकर रोड, माळीवाडा येथे २५ मार्च रोजी सकाळी १० ते ४ या वेळेत जबड्याच्या व मुख कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, असे संचालक डॉ. सुदर्शन गोरे सांगितले. या शिबिरासाठी नाव नोंदणीसाठी ९०२८३०६०२० नंबर वर संपर्क करावा.

डॉ. सुदर्शन गोरे म्हणाले की वारंवार तोंड येणे, गालाला लाल चट्टे येणे, गालाला पांढरे चट्टे येणे, तिखट खाताना गालांची जळजळ होणे, वारंवार गालाला जखमा होणे, तोंड पूर्वीपेक्षा कमी उघडणे ही मुखाच्या व जबड्याच्या कर्करोगाची पूर्व प्राथमिक लक्षणे आहेत. याचे रुग्णांनी त्वरित निदान करून त्यावर उपचार करून घ्यावेत हा या शिबिराचा उद्देश आहे.

शिबिरामध्ये आत्याधुनिक डेंटल ओपीजी स्कॅन मशीनद्वारे जबड्याच्या कॅन्सरचे निदान करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच या शिबिरामध्ये मुख शनेचिकित्सक व कर्करोग तज्ञ, मॅक्झिलो फेशियल सर्जन डॉ. प्रवीण भोस हे देखील मार्गदर्शन करणार आहे.

### राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त

# जय आनंद महावीर युवक मंडळातर्फे २८ मार्चला महाभोजन कार्यक्रम

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने २८ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत अन्नदान (महाभोजन) कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

मंडळाने अनेक वर्षांपूर्वी आचार्यश्रींच्या स्मृतीदिनी अन्नदानाचा उपक्रम सुरू केला. यंदा मंडळ रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. दरवर्षी अनेकांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबविला जातो. पुरीभाजी, बुंदी, मसालेभात अशा रूचकर भोजनाचा आस्वाद उपस्थित घेतात. शुध्द व थंडगार पाण्याचीही स्वतंत्र व्यवस्था केली जाते. उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेवून मंडळातर्फे नवीपेठेत खास मंडप उभारण्यात येतो. वयोवृध्द, अपंगांना खाली मांडी घालून भोजन करताना त्रास होतो हे लक्षात घेवून भोजनासाठी खास टेबल खुर्च्यांचीही व्यवस्था करण्यात येते. संपूर्ण स्वयंपाक हायजिन पध्दतीने स्वच्छता राखून होईल, याची मंडळातर्फे विशेष दक्षता घेण्यात येते. अशी माहिती मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा यांनी दिली.


शैलेश मुनोत

मंडळाच्या या महाभोजनाचा दरवर्षी हजारोंच्या संख्येने भाविक लाभ घेतात. मंडळातर्फे वंचित मुलांच्या विविध संस्थांनाही प्राधान्याने भोजन पोहोच केले जाते. या कार्यक्रमासाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तब्बल महिनाभर परिश्रम घेतात.

नवीपेठमध्ये आयोजित केलेल्या या महाभोजनाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जय आनंद महावीर युवक मंडळ रौप्य महोत्सवी वर्षाचे कार्याध्यक्ष सत्येन मुथा व मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगरमध्ये २५ मार्चला कै. श्रीमती इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कारांचे वितरण

नगर – समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरवासाठी कै. श्रीमती इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कार – २०२६ वितरण सोहळ्याचे आयोजन २५ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता केशरगुलाब मंगल कार्यालय, अहिल्यानगर येथे होणार आहे.

समर्पण, सेवा आणि समाजहिताचा आदर्श देणाऱ्या कै. श्रीमती इचरजबाई हस्तीमल मुनोत यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा पुरस्कार २०२५ पासून सुरू करण्यात आला आहे. समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्याचा हा उपक्रम आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व प्रमुख पाहुणे म्हणून कॅन्टोन्मेंटच्या सीईओ पल्लवी विजयवंशी हे उपस्थित राहणार आहेत

हा सन्मान पुढील महिलांना प्रदान करण्यात येणार आहे. सौ. उषा देशमुख – औद्योगिक क्षेत्रातील व शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी., सौ. रुपाली मुनोत – समाजसेवा क्षेत्रातील कार्यासाठी (स्नेहालय व दत्तक केंद्र कार्य), सौ. मीना मुनोत – सहकार व पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासाठी, डॉ. श्रीमती मार्शिया वॉरेन – वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी कार्यक्रमाचे आयोजन केजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत व महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांच्यावतीने करण्यात आले आहे.


हिंदू संमेलनानिमित्त माळीवाडा परिसर येथून कलश शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी सरलाबेट चे हभप रामगिरी महाराज यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांचे औक्षण करण्यात आले.


बोल्हेगाव उपनगरातील गांधीनगर येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली.

# बोल्हेगाव येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची नमाज अदा

नगर – बोल्हेगाव उपनगरातील गांधीनगर येथील मदिना मस्जिदमध्ये रमजान ईदची विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी भारताच्या प्रगतीसाठी तसेच देशात अमन व शांतता नांदावी यासाठी प्रार्थना करण्यात आली.

रमजान महिना हा प्रेम, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देणारा पवित्र महिना आहे. या महिन्यात मुस्लिम समाज महिनाभर रोजे (उपवास) ठेवून शेवटच्या दिवशी ईद-उल-फित्र, म्हणजेच रमजान ईद उत्साहात साजरी करतो. ईद-उल-फित्रच्या दिवशी गांधीनगरच्या मस्जिदमध्ये नमाज अदा करून देशाच्या प्रगतीसाठी, तसेच देशात शांतता आणि सौहार्द टिकून राहावे यासाठी अल्लाहकडे विशेष दुआ करण्यात आली.

या प्रसंगी नगर जिल्ह्यात जातीभेद विसरून सर्व समाजाने एकोप्याने राहावे, यासाठी देखील प्रार्थना करण्यात आली. नमाजनंतर उपस्थितांनी एकमेकांना शुभेच्छा देत बंधुभाव व ऐक्याचा संदेश दिला. ईदच्या निमित्ताने गरीब व गरजू नागरिकांना मदत करण्याचेही आवाहन करण्यात आले.

यावेळी मौलाना इर्शाद रझवी आलम यांनी सामुदायिक नमाज पठण करुन एकात्मतेचा संदेश दिला. तसेच मदिना मस्जिदचे अध्यक्ष नुरमहंमद शेख, चांद शेख, रज्ञाक शेख, महेबूब शेख, लतीफ बेग, अजीजखा पठाण, जब्बार शेख, युनुस बेग,दिलावर शेख, आयुब शेख, राजू शेख, मुख्तार शेख, इस्राईल पठाण, फारुख पठाण, फिरोज शेख, रिजवान शेख उपस्थित होते.

# रमजान ईद उत्साहात साजरी, हिंदू-मुस्लिम ऐक्याचा दर्शन

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथे मुस्लिम समाजाची रमजान ईद (ईद-उल-फित्र) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातील मुस्लिम बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ईद मिलन कार्यक्रमातून हिंदू- मुस्लिम ऐक्याचे प्रभावी दर्शन घडले. या कार्यक्रमात हिंदू समाजबांधवांनी सहभागी होत ईदच्या शुभेच्छा दिल्या. सकाळी शाही मस्जिदच्या मैदानावर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. मौलाना मुनीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करून देशात शांतता, सुख-समृद्धी व धार्मिक सलोखा टिकून राहावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.



संध्याकाळी आयोजित ईद मिलन कार्यक्रमात गावातील वाड्या-वस्तीवरील सर्व समाजातील नागरिक एकत्र आली होती. यावेळी हिंदू- मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडत होते. यावेळी सर्वांनी पारंपरिक शीरखुर्माचा आस्वाद घेत एकमेकांप्रती प्रेम व आपुलकी व्यक्त केली.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, माजी उपसरपंच फारुख सय्यद, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, माजी पं. स. सदस्य देवा होले, सरपंच संजय अशोक जपकर, रामदास फुले, माजी उपसरपंच संजय आसाराम जपकर, दादू चौगुले, जालिंदर शिंदे, चेअरमन सुरेंद्र होळकर, बाबूलाल सय्यद, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंतराव पवार, प्रा. एकनाथ होले, मौलाना मुनीर सय्यद, ग्रामपंचायत सदस्य बंडू जपकर, बाबासाहेब होळकर, उमर सय्यद, सुरेश कदम, जावेद सय्यद, रमीज सय्यद वाजीद सय्यद, व्हा. चेअरमन सादिक पवार, गुलाब सय्यद, बबन सय्यद, जमीर सय्यद, मेहबूब सय्यद, सादिक सय्यद, मुक्तार सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, सलीम सय्यद, युनूस सय्यद, हन्सार सय्यद, कयूम सय्यद, उमर सय्यद, नावेद सय्यद, आदिल सय्यद, परवेज सय्यद, बादशाह सय्यद, रफिक सय्यद, एजाज सय्यद, इम्रान सय्यद, हुसेन सय्यद, इरशाद शेख, अशोक जपकर, अंबादास जपकर, दादाभाऊ होळकर, मच्छिंद्र जपकर, भास्कर जपकर, अतुल जपकर, पोलीस पाटील अरुण होले, अजर सय्यद, दानिश सय्यद आदींसह नाले हैदर यंग पार्टी, दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

रमजान ईद हा आनंद, संयम आणि आपुलकीचा सण आहे. या सणाच्या निमित्ताने समाजात परस्पर स्नेह आणि बंधुभाव अधिक दृढ होतो. नेप्ती गावात सर्व समाज एकत्र येऊन सण साजरे करतात, ही आपली परंपरा आहे. अशा कार्यक्रमांमुळे आपले आपसातील नाते अधिक घट्ट होत असून, समाजात सौहार्द आणि सकारात्मक वातावरण निर्माण होते. रमजान ईद सण हा समाजात व गावात बंधुभाव वाढवतो असे प्रतिपादन माजी उपसरपंच फारुख सय्यद यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाले हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# संयमातून साकारलेला दिव्य जीवनप्रवास

२४ मार्च – एका शिष्याच्या जीवनातील अमूल्य आणि अविस्मरणीय क्षण म्हणून ओळखला जाणारा हा दिवस, गुरुचरणी आयुष्य अर्पण करण्याच्या दृढ संकल्पाने आणि गुरुकृपेच्या स्पर्शाने अधिकच पावन ठरतो. सन १९७४ मध्ये घडलेली ही घटना जणू लोखंडाला परीसस्पर्श झाल्याप्रमाणे होती. गुरुंच्या पारखून पाहणाऱ्या दृष्टीने जेव्हा प्रकाश देसर्डा यांना ओळखले, तेव्हा ते केवळ प्रकाश राहिले नाहीत, तर एक दिव्य प्रकाशदूत म्हणून घडू लागले.


प्रविणऋषीजी म.सा.

केवळ सतराव्या वर्षी त्यांच्या जीवनात घडलेला हा परिवर्तनाचा क्षण त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाचा खरा आरंभ ठरला. या घडणीमागे त्यांच्या कुटुंबीयांचे संस्कार आणि गुणांचे भक्कम अधिष्ठान होते. आई चंपाबाई देसर्डा यांच्या जिद्दी, चिकाटी आणि संपूर्ण समर्पणाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला, तर वडील दगडुलालजी देसर्डा यांच्या प्रखर बुद्धिमत्ता, दूरदृष्टी आणि निर्णयक्षमतेने त्यांना विचारांची ताकद दिली. या दोन्ही प्रवाहांचे सुंदर संमिश्रण म्हणजे प्रकाश देसर्डा, ज्यांच्यावर गुरुकृपेची छाया पडताच त्यांचे जीवन एका वेगळ्याच उंचीवर पोहोचले.

गुरुमाउलींच्या वात्सल्यपूर्ण कृपेने ओळख मिळाल्यानंतर ते पुढे पूज्य ऋषी प्रविणजी महाराज म्हणून उदयास आले-एक असे व्यक्तिमत्त्व, ज्यांनी स्वतःच्या जीवनाला केवळ साधनेतच नाही तर समाजप्रबोधनातही वाहून घेतले. त्यांच्या जीवनप्रवासात एक सुंदर उदाहरण दिसते-जसे एक दिवा दुसऱ्या दिव्याला प्रज्वलित करतो, तसेच त्यांच्या निर्मळ आणि भक्तीपूर्ण अंत:करणाने त्या दिव्यतेला स्वीकारले आणि आज त्यांच्या प्रकाशाने असंख्य जीवन उजळून निघाले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराजसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची घडण अधिक परिपूर्ण झाली. त्यांच्या माध्यमातून नवकार कलश आणि अर्हम विज्ञा यांसारख्या आध्यात्मिक उपक्रमांनी विश्वशांतीचा संदेश घराघरांत पोहोचवण्याचे कार्य घडू लागले. गुरुमाउलींचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे समर्पित केले आणि त्यामुळेच ते आज अनेकांसाठी दीपस्तंभ ठरले आहेत.

ऋषी प्रविणजी महाराजांनी विविध महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा सखोल अभ्यास करून त्यांना आपल्या जीवनात आत्मसात केले. भगवान बुद्ध यांचे तत्वज्ञान, महात्मा गांधी यांची मूल्यव्यवस्था, संत ज्ञानेश्वरांची अध्यात्मिक दृष्टी, सीतेचे सहनशीलतेचे आदर्श आणि तीर्थंकर महावीरांचे तत्त्वज्ञान-या सर्वांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. त्यामुळेच त्यांनी अंधारात भटकण्याऐवजी प्रकाशाचा मार्ग निवडला आणि अंतर्मनाच्या शांत समाधी अवस्थेत स्थिरावले.

आज त्यांच्या कार्याकडे पाहताना असे जाणवते की, त्यांचे संपूर्ण जीवन अर्हम विज्ञेच्या प्रसारासाठीच समर्पित आहे. त्यांचा संदेश अत्यंत साधा, पण तितकाच प्रभावी आहे-घरोघरी अध्यात्म आणि प्रत्येकाच्या जीवनात शांती प्रस्थापित करणे. त्यांच्या या अखंड प्रयत्नांमुळेच असंख्य लोकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडताना दिसते.

भक्तीभावाने व्यक्त होणाऱ्या भावना त्यांच्या विषयी एक सुंदर अभिव्यक्ती देतात-ते केवळ एक गुरु नाहीत, तर जीवनाला दिशा देणारे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या जीवनाचा हा प्रेरणादायी प्रवास प्रत्येकाला आत्मचिंतन आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारा ठरतो. **– आनंद उपासिका साध्वी ओजसदर्शनाजी**

# महावीर जयंतीदिनी सर्व कत्तलखाने, मांस विक्री संपूर्ण दिवस बंद ठेवावी

नगर – संपूर्ण जगाला शांतीचा व अहिंसेचा संदेश देणारे श्री भगवान महावीर स्वामींची जयंती (जन्मकल्याणक) ३१ मार्च रोजी साजरी होत आहे. यानिमित्त देशभरात तसेच महाराष्ट्रात, अहिल्यानगर जिल्हा, शहरात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. तरी यादिवशी यापूर्वीच्या शासन निर्णयानुसार संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा, शहर, उपनगरे, भिंगार येथील सर्व कत्तलखाने व मांस विक्री संपूर्ण दिवस बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ, जैन मंदिर, कापडबाजार यांच्यावतीने करण्यात आली आहे. जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व ट्रस्टी मंडळाने सदर मागणीचे निवेदन २० मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना दिले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, श्री भगवान महावीर स्वामी यांची शांती व अहिंसेची शिकवण जगाला दिशा देणारी आहे. त्यांच्या जयंतीचे पावित्र्य जपण्यासाठी शासनाकडून दरवर्षी भगवान महावीर जयंतीदिनी सर्व कत्तलखाने व मांस विक्री बंद ठेवण्यात येते. याहीवर्षी शासन निर्णयाप्रमाणे सदर आदेशाची कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनाच्याप्रती पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलिस अधीक्षक, आयुक्त, मनपा यांनाही देण्यात आल्या आहेत.

# १० वर्षीय सुलतान जहागीरदारचे महिनाभर उपवास पूर्ण

नगर – पवित्र रमजान महिन्याच्या आध्यात्मिक वातावरणात केवळ १० वर्षांच्या सुलतान शोहेब जहागीरदार या चिमुकल्याने पूर्ण ३० रोजे (उपवास) यशस्वीरीत्या पूर्ण करत एक प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. एवढ्या लहान वयात दाखविलेली चिकाटी, श्रद्धा आणि संयम यामुळे बेलदार गल्ली व तेलीखूंट परिसरात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



रमजान हा केवळ उपवासाचा नव्हे, तर आत्मशुद्धी, संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा महिना मानला जातो. सुलतानने दिवसभर उपाशी राहूनही नमाज अदा करणे, कुरआन पठण आणि इतर धार्मिक कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत या मूल्यांचे पालन केले. त्याच्या या प्रयत्नांमुळे केवळ कुटुंबीयच नव्हे, तर परिसरातील नागरिकही भावूक झाले आहेत.

सुलतानच्या या यशामागे त्याच्या कुटुंबीयांचा आधार असून तो साहेबानं जहागीरदार यांचा भाचा आणि पप्पू जहागीरदार यांचा नातू आहे. जहागीरदार परिवाराकडून मिळालेले योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि धार्मिक संस्कार यामुळेच सुलतानने हे कठीण वाटणारे उद्दिष्ट सहज पूर्ण केले.

# अर्थजगत




## सॉव्हेरियन गोल्ड बाँड घेतले आहेत?

**केंद्र सरकारने २०२६ च्या अर्थसंकल्पात सॉव्हेरीयन गोल्ड बाँडच्या करस्चनेत मोठी सुधारणा केली आहे. आतापर्यंत या रोख्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांसाठी मुदतीअंती मिळणारा नफा पूर्णपणे करमुक्त होता, मात्र १ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या नियमांनुसार हा लाभ केवळ ठराविक अटी पूर्ण करणाऱ्या गुंतवणूकदारांनाच मिळेल.**

ज्या गुंतवणूकदारांनी रिझर्व्ह बँकेच्या प्राथमिक विक्रीच्या वेळी हे रोखे खरेदी केले आहेत आणि ते सलग आठ वर्षांच्या पूर्ण मुदतीपर्यंत स्वतःकडे राखले आहेत, त्यांनाच केवळ मुदतीअंती मिळणारा भांडवली नफा करमुक्त असेल. याउलट, दुय्यम बाजारपेठेतून म्हणजे शेअर बाजारातून सुवर्ण रोख्यांची खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आता करमुक्ततेचे कवच काढून घेण्यात आले आहे.

अशा गुंतवणूकदारांनी जरी मुदतीपर्यंत हे रोखे बाळगले, तरी त्यांना मुदतीअंती होणाऱ्या नफ्यावर साडेबारा टक्के दराने दीर्घकालीन भांडवली नफा कर भरावा लागेल. जर हे रोखे खरेदी केल्यापासून १२ महिन्यांच्या आत विकले गेले, तर तो अल्पकालीन भांडवली नफा मानला जाईल आणि गुंतवणूकदाराच्या प्राप्तिकराच्या टप्प्यानुसार त्यावर कर आकारला जाईल. १२ महिन्यांनंतर मात्र निर्देशांकाचा लाभ न मिळता साडेबारा टक्के दराने कर आकारणी निश्चित करण्यात आली आहे.

या बदलांमागे सरकारचा मुख्य उद्देश केवळ दीर्घकालीन आणि मूळ गुंतवणूकदारांनाच प्रोत्साहन देणे हा दिसून येतो. गेल्या काही काळापासून दुय्यम बाजारपेठेत सुवर्ण रोख्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून कर सवलतीचा फायदा घेण्याचे प्रमाण वाढले होते, ज्याला आता चाप बसणार आहे.

तसेच जागतिक बाजारपेठेत सोन्याचे भाव गगनाला भिडल्यामुळे या रोख्यांच्या पुनर्खरेदीवेळी सरकारवर येणारा आर्थिक ताण कमी करणे हा देखील या निर्णयामागचा एक महत्त्वाचा तांत्रिक हेतू असू शकतो.

सोन्याच्या वाढलेल्या किमतींमुळे मुदतीअंती द्यावी लागणारी रक्कम मोठी असल्याने, दुय्यम बाजारातील सट्टेबाजी कमी करून सरकारी तिजोरीवरील भार सौम्य करण्याचा प्रयत्न यातून स्पष्ट होतो. यामुळे आता केवळ प्राथमिक स्तरावर गुंतवणूक करणाऱ्यांनाच पूर्ण कर सवलतीचा लाभ घेता येईल आणि दुय्यम बाजारातून खरेदी करणाऱ्यांना आपल्या नफ्यातील काही हिस्सा कराच्या स्वरूपात सरकारला द्यावा लागेल.

---




## सोने-चांदी ईटीएफ आणि फंडांवरील कर आकारणी

बाजारातील अस्थिरतेमुळे अनेक गुंतवणूकदार एकाच दिवसात (इंट्राडे) किंवा अल्प कालावधीसाठी वा तोट्यावर प्राप्तिकर कायद्यानुसार खालीलप्रमाणे कर लागू होतो.

**१. ईटीएफवरील कर रचना**

अल्पकालीन भांडवली नफा : जर तुम्ही ईटीएफ १ वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी बाळगले आणि विकले, तर त्यावर २० टक्के दराने कर आकारला जातो.

दीर्घकालीन भांडवली नफा: जर गुंतवणुकीचा कालावधी १ वर्षापेक्षा जास्त असेल, तर त्यावर १२.५ टक्के दराने कर लागू होतो.

**२. गोल्ड/सिल्व्हर फंड ऑफ फंडांवरील कर**

दीर्घकालीन यासाठी गुंतवणुकीचा कालावधी २ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. यावर १२.५ टक्के कर लागतो.

**अल्पकालीन :** दोन वर्षांच्या आत विक्री केल्यास, होणारा नफा तुमच्या प्राप्तिकर स्लॅबनुसार उत्पन्नात धरला जातो आणि त्यानुसार कर आकारला जातो.

**३. 'इंट्राडे' व्यवहारांवरील कर**

एकाच दिवसात ईटीएफची खरेदी आणि विक्री केल्यास तो व्यवहार 'स्पेक्युलेटिव्ह बिझनेस इन्कम' मानला जातो.हा नफा तुमच्या वार्षिक उत्पन्नात मिळवला जातो आणि तुमच्या टॅक्स स्लॅबनुसार त्यावर कर आकारला जातो.

इंट्राडे व्यवहारातील तोटा केवळ दुसऱ्या नफ्यातूनच वजा करता येतो. उदाहरणार्थ, ईटीएफमधील १०,००० रुपयांचा इंट्राडे तोटा हा समभागांमधील १५,००० रुपयांच्या इंट्राडे नफ्यातून वजा होऊ शकतो. मात्र, डिलिव्हरी आधारित व्यवहारातील नफ्यातून हा तोटा वजा करता येत नाही.

जर तुम्हाला ईटीएफ किंवा फंड ऑफ फंडस्मध्ये 'शॉर्ट टर्म कॅपिटल लॉस' झाला असेल, तर तो तुम्ही इतर समभाग किंवा इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडांच्या अल्पकालीन किंवा दीर्घकालीन नफ्यातून वजा करू शकता.

इक्विटी गुंतवणुकीवर मिळणारी वार्षिक १.२५ लाख रुपयांची करसवलत सोने किंवा चांदीच्या ईटीएफला लागू नसते. त्यामुळे यातील पूर्ण दीर्घकालीन नफ्यावर १२.५% दराने कर भरावा लागतो.

---

**आरोग्य विमा केवळ रुग्णालयातील मोठ्या खर्चांसाठी कवच पुरवतो, परंतु वयोमानानुसार उद्भवणारे इतर वैद्यकीय खर्च पेलण्यासाठी एका स्वतंत्र वैद्यकीय आपत्कालीन निधीची निर्मिती करणे अनिवार्य असल्याचे मत आर्थिक तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. केवळ विम्यावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते, कारण अनेकदा बाह्यरुग्ण विभागातील उपचार, महागड्या चाचण्या आणि नियमित औषधोपचारांचा खर्च विम्यात समाविष्ट नसतो.**

## केवळ आरोग्यविमा पुरेसा नाही!

**वैद्यकीय आपत्कालीन निधीची गरज आणि महत्त्व**

भारतातील बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंबे विम्याशिवाय उद्भवणाऱ्या एका मोठ्या वैद्यकीय खर्चामुळे आर्थिक संकटात सापडू शकतात. विशेषतः पन्नाशीनंतर रुग्णालयाची वारी ही नित्याची बाब होते. अशा वेळी विम्याचा दावा केवळ रुग्णालयात भरती झाल्यावरच करता येतो, मात्र मधुमेह किंवा रक्तदाबासारख्या जुनाट आजारांसाठी लागणारी नियमित औषधे आणि वारंवार कराव्या लागणाऱ्या तपासण्यांचा खर्च लाखो रुपयांच्या घरात जाऊ शकतो. म्हणूनच विम्याच्या जोडीला एक दुय्यम सुरक्षा कवच म्हणून हा निधी असणे आवश्यक आहे. हा निधी अशा वेळी उपयुक्त ठरतो जेव्हा विम्याची मर्यादा संपलेली असते किंवा एखाद्या विशिष्ट आजारासाठी विमा कंपनीकडून पैसे नाकारले जातात. तसेच उतारवयात विम्याचे हप्ते भरण्यासाठीही या निधीचा वापर करता येतो.



**एनपीएस आरोग्य पेन्शन योजना आणि नवीन प्रयोग**

पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरणाने (पीएफआरडीए) नुकताच 'एनपीएस स्वास्थ्य पेन्शन योजना' नावाचा एक प्रायोगिक प्रकल्प सुरू केला आहे. अमेरिकेतील 'हेल्थ सेव्हिंग्स अकाउंट'च्या धर्तीवर ही संकल्पना आधारित आहे. याचा मूळ उद्देश गुंतवणूकदारांना आरोग्याशी संबंधित खर्चासाठी एक स्वतंत्र निधी उभारण्याची संधी देणे हा आहे. ही योजना नॅशनल पेन्शन सिस्टिमसारखीच कार्य करेल, जिथे गुंतवणुकीवर कर सवलत मिळेल आणि संकटकाळी तो पैसा वापरता येईल. अशा स्वरूपाच्या योजनांमुळे भविष्यात आरोग्य नियोजनाला अधिक शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त होणार आहे.

**निधीची उभारणी आणि गुंतवणुकीचे नियोजन**


तज्ज्ञांच्या मते, पन्नाशी ओलांडलेल्या दांपत्याकडे आजच्या काळात किमान २० ते २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा असणे आवश्यक आहे. या विम्याच्या रकमेच्या किमान ५० टक्के इतका स्वतंत्र वैद्यकीय आपत्कालीन निधी उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, जर तुमचा विमा २० लाख रुपयांचा असेल, तर १० लाख रुपयांचा राखीव निधी असणे सुरक्षित ठरेल. हा निधी एकाच वेळी उभा करण्याची घाई न करता, दरमहा ठराविक रक्कम बाजूला काढून तो टप्प्याटप्प्याने निर्माण करता येईल. यासाठी म्युच्युअल फंडातील 'सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन'चा (एसआयपी) प्रभावी वापर करता येईल. ५० टक्के रक्कम कर्ज किंवा समभाग बचत फंडात आणि उर्वरित ५० टक्के रक्कम अॅग्रेसिव्ह हायब्रीड फंडात गुंतवून एक उत्तम वैद्यकीय कोष तयार करता येतो.

आरोग्य विमा ही तुमची बचावाची पहिली फळी असली, तरी वैद्यकीय आपत्कालीन निधी ही तुमची पर्यायी योजना आहे. विम्याची रक्कम प्रत्येक वर्षी नूतनीकरणानंतर पुन्हा उपलब्ध होते, मात्र तुमचा स्वतःचा निधी एकदा खर्च झाला की तो पुन्हा भरून काढावा लागतो, ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे तरुण वयातच किंवा पालकांच्या वाढत्या वयाचा विचार करून अशा निधीचे नियोजन केल्यास उतारवयात आर्थिक चिंता भेडसावणार नाही.

---

## पॅनिक सेलिंग टाळा, संयमाची फळे चाखा!

**भू-राजकीय संकटामुळे अनेकदा शेअर बाजारामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते आणि मोठ्या प्रमाणावर चढ-उतार पाहायला मिळतात. मात्र, दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार केला तर अशा घटनांचा परताव्यावर कायमस्वरूपी परिणाम होत नाही. 'व्हाईटओक कॅपिटल म्युचुअल फंड'च्या अहवालानुसार, प्रत्यक्ष संकटापेक्षा गुंतवणूकदारांनी भीतीपोटी घेतलेले चुकीचे निर्णय अधिक नुकसानकारक ठरतात. प्रत्येक मोठ्या संकटानंतर बाजार पुन्हा जोमाने उभारी घेतो, हे २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला, कोरोना महामारी आणि रशिया-युक्रेन युद्ध यांसारख्या उदाहरणांवरून स्पष्ट होते. त्यामुळे अशा वेळी घाबरून शेअर्स विकण्यापेक्षा (पॅनिक सेलिंग) आपल्या मालमत्ता वाटपावर (अॅसेट अलोकेशन) लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.**



**दीर्घकालीन परताव्यावर परिणाम का होत नाही?**

भू-राजकीय घटनांमुळे गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम होतो आणि बाजारात अस्थिरता निर्माण होते, पण त्याचा अर्थव्यवस्थेच्या पायाभूत रचनेवर फारसा परिणाम होत नाही. शेअर बाजार प्रामुख्याने कंपन्यांची कमाई, व्याजदर आणि शेअर्सचे मूल्यांकन या मूलभूत गोष्टींवर चालतो. या गोष्टी भू-राजकीय संकटामुळे कायमस्वरूपी बदलत नाहीत. उदाहरणार्थ, रशिया-युक्रेन युद्धाच्या काळात ऊर्जेच्या किमती वाढल्या आणि महागाई वाढली, तरीही भारतीय कंपन्यांच्या व्यापाराची दिशा बदलली नाही. बँकिंग क्षेत्राने कर्ज देणे सुरू ठेवले, आयटी कंपन्यांच्या सेवा सुरू राहिल्या आणि ग्राहकांनी वस्तू खरेदी करणे थांबवले नाही.

**संकट आणि आर्थिक संरचना यातील फरक**

भू-राजकीय संकटे ही प्रामुख्याने 'सेंटिमेंट शॉक' म्हणजेच केवळ मानसिक धक्का देणारी असतात. याउलट २००८ चे जागतिक आर्थिक संकट हे केवळ भू-राजकीय नव्हते, तर ते अर्थव्यवस्थेच्या पायाभूत रचनेवर झालेले आघात होते. त्यामुळे त्यातून सावरण्यासाठी देशाला अनेक वर्षे लागली. मात्र, भू-राजकीय संकटांमध्ये कंपन्या स्वतःला परिस्थितीनुसार जुळवून घेतात आणि पुन्हा नफ्यात येतात. टीव्ही न्यूज चॅनेलवर दाखवल्या जाणाऱ्या बातम्यांमुळे परिस्थिती गंभीर वाटू शकते, पण अशा काळात आपल्या गुंतवणुकीच्या नियोजनावर ठाम राहणे आणि शिस्त पाळणे हाच योग्य मार्ग आहे.

**ऐतिहासिक घटना आणि बाजाराची भरारी**

गेल्या काही दशकांमध्ये अनेक मोठी संकटे आली, पण बाजार दरवेळी सावरला आहे. १९९८ च्या रशियन कर्ज संकटानंतर अवघ्या सहा महिन्यांत बाजार पूर्वपदावर आला आणि पुढील पाच वर्षांत गुंतवणूकदारांना १५ टक्के वार्षिक परतावा मिळाला. २००१ च्या अमेरिकेवरील ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर निफ्टी दोन आठवड्यांत १७ टक्क्यांनी घसरला होता, पण डिसेंबरपर्यंत तो पुन्हा पूर्वपदावर आला. तसेच २०१६ चा सर्जिकल स्ट्राईक किंवा २०१९ चा बालाकोट एअरस्ट्राईक यांसारख्या घटनांनंतर बाजार काही दिवसांतच सावरला. २०२० च्या कोरोना संकटात तर बाजार ३२ टक्क्यांनी कोसळला होता, पण अवघ्या चार महिन्यांत त्याने पुन्हा मोठी झेप घेतली.

### संकटात दडलेली संधी आणि अॅसेट अलोकेशन

तज्ज्ञांच्या मते, शिस्तबद्ध गुंतवणूकदारांसाठी अशी संकटे ही गुंतवणुकीची मोठी संधी असू शकतात. जेव्हा बाजार कोसळतो, तेव्हा पोर्टफोलिओमधील इक्विटीचा हिस्सा कमी होतो. अशा वेळी आपल्या नियोजित 'अॅसेट अलोकेशन'नुसार (उदा. ६५% इक्विटी, २५% डेट आणि १०% सोने) पुन्हा गुंतवणूक करणे फायदेशीर ठरते. जेव्हा इतर गुंतवणूकदार भीतीपोटी शेअर्स विकत असतात, तेव्हा कमी किमतीत शेअर्स खरेदी करण्याची ही उत्तम वेळ असते. भू-राजकीय संकटे ही बाजाराच्या दीर्घ प्रवासात केवळ 'स्पीड ब्रेकर'प्रमाणे असतात, हे लक्षात घेऊन गुंतवणूकदारांनी आपला संयम सोडू नये.

---

## लाईफ सायकल फंडांचे उणेअधिक

लाईफ सायकल फंडांमध्ये समभाग, रोखे (डेट), रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट, सुवर्ण आणि रौप्य ईटीएफ अशा विविध मालमत्तांमध्ये गुंतवणूक केली जाते. या फंडांची किमान मुदत ५ वर्षे तर कमाल मुदत ३० वर्षे असते आणि ही मुदत ५ च्या पटीत (उदा. १०, १५, २० वर्षे) असणे बंधनकारक आहे. जेव्हा या फंडाची मुदत संपायला एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक असतो, तेव्हा सभासदांच्या संमतीने हा फंड जवळच्या मुदतीच्या दुसऱ्या फंडात विलीन केला जाऊ शकतो. गुंतवणुकीत शिस्त राखण्यासाठी सुरुवातीच्या तीन वर्षांत बाहेर पडल्यास ३ ते १ टक्क्यांपर्यंत एक्झिट लोड (बाहेर पडण्याचे शुल्क) आकारला जातो.



या फंडातील समभाग वाटप मुदतीनुसार बदलत जाते. उदाहरणार्थ, १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी शिल्लक असल्यास समभाग हिस्सा ६५% ते ९५% असू शकतो, जो शेवटच्या एक ते तीन वर्षांत २०% ते ३५% पर्यंत खाली आणला जातो. तसेच मुदत संपायला तीन वर्षे शिल्लक असताना, रोख्यांमधील गुंतवणूक केवळ 'एए' किंवा त्यापेक्षा जास्त पतमानांकन (क्रेडिट रेटिंग) असलेल्या साधनांमध्येच करणे अनिवार्य आहे.

**गुंतवणूकदारांसाठी हे फंड खरोखर फायदेशीर आहेत का?**

अनेक गुंतवणूकदारांना असे वाटू शकते की, या फंडामुळे पोर्टफोलिओचे संतुलन राखणे किंवा जोखीम कमी करण्याची चिंता मिटेल. मात्र, यात काही तांत्रिक आणि व्यवहार्य अडचणी आहेत:

**व्यवस्थापन जोखीम:** केवळ एका फंडावर विसंबून राहणे अत्यंत जोखमीचे असते. जर त्या फंडाचे व्यवस्थापन अपेक्षित कामगिरी करू शकले नाही, तर पूर्ण ध्येयावर त्याचा परिणाम होतो. सक्रिय व्यवस्थापित फंडांच्या बाबतीत ही जोखीम अधिक असते.

**अपूर्ण पोर्टफोलिओ व्यवस्थापन:** बहुतांश गुंतवणूकदारांकडे या फंडाव्यतिरिक्त इतर समभाग किंवा मुदत ठेवी असू शकतात. अशा वेळी केवळ हा फंड स्वतःहून संतुलित झाला तरी, संपूर्ण पोर्टफोलिओचे संतुलन गुंतवणूकदाराला स्वतःच करावे लागेल.

**अवास्तव जोखीम:** 'सेबी'ने दिलेल्या कोष्टकानुसार, मुदत संपायला केवळ १ ते ३ वर्षे उरलेली असतानाही २०% ते ३५% समभाग हिस्सा राखणे हे अत्यंत धाडसी आणि काहीसे धोकादायक ठरू शकते. ध्येय जवळ आलेले असताना बाजारात मोठी घसरण झाल्यास साठवलेल्या पुंजीला फटका बसू शकतो.

'सेबी'ने सर्व फंड घराण्यांसाठी (एएमसी) एकच 'ग्लाईड पाथ' किंवा समभाग कमी करण्याची पद्धत निश्चित केली आहे. जर कंपन्यांना स्वतःचे मॉडेल निवडण्याची मुभा असती, तर गुंतवणूकदारांना विविध पर्यायांमधून निवड करता आली असती. थोडक्यात सांगायचे तर, केवळ कर वाचवण्यासाठी किंवा सुलभतेसाठी या नवीन श्रेणीकडे वळण्यापेक्षा, स्वतःच्या उद्दिष्टांनुसार तयार केलेला वैयक्तिक पोर्टफोलिओ अधिक सुरक्षित ठरू शकतो.

---

## समस्या फंडांमधील ओव्हरलॅपिंगची

म्युच्युअल फंड गुंतवणुकीत दोन फंडांमधील समभागांचे साधर्म्य म्हणजेच 'ओव्हरलॅप' तपासणे अत्यंत आवश्यक असते. लार्जकॅप फंडांच्या तुलनेत सक्रिय स्मॉलकॅप फंडांमध्ये पोर्टफोलिओ ओव्हरलॅप लक्षणीयरीत्या कमी असल्याचे दिसून येते.

स्मॉलकॅप श्रेणीमध्ये फंडांमध्ये फारसे साधर्म्य नसण्यामागे काही महत्त्वाची तांत्रिक कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे लार्जकॅप फंडांसाठी निवडीचे क्षेत्र केवळ पहिल्या १०० कंपन्यांपर्यंत मर्यादित असते. याउलट, स्मॉलकॅप श्रेणीत निवडण्यासाठी कंपन्यांची संख्या प्रचंड मोठी आहे, त्यामुळे प्रत्येक फंड मॅनेजरच्या पोर्टफोलिओमध्ये वेगळे समभाग असण्याची शक्यता वाढते.

स्मॉलकॅप क्षेत्रात 'अल्फा' म्हणजेच बाजारापेक्षा अधिक परतावा मिळवण्यासाठी प्रत्येक फंड मॅनेजर वेगवेगळ्या रणनीती आणि शैलींचा अवलंब करतो. यामुळे एकाच श्रेणीतील दोन फंडांचे पोर्टफोलिओ एकमेकांपासून वेगळे ठरतात.

जर एखाद्या गुंतवणूकदाराचा पोर्टफोलिओ मोठा असेल आणि स्मॉलकॅपमधील गुंतवणूक अधिक असेल, तर एकापेक्षा जास्त स्मॉलकॅप फंडांत गुंतवणूक करणे फायदेशीर ठरू शकते. यामुळे एखाद्या खराब कामगिरी करणाऱ्या फंडाचा जोखीम घटक कमी होण्यास मदत होते. स्मॉलकॅप श्रेणीत पॅसिव्ह फंडांपेक्षा (इंडेक्स फंड) सक्रियरीत्या व्यवस्थापित केलेले फंड अधिक चांगला परतावा देऊ शकतात, असे ऐतिहासिक आकडेवारीवरून स्पष्ट होते.



स्मॉलकॅप फंडांचा गेल्या काही वर्षांतील परतावा आकर्षक वाटत असला तरी, प्रत्येक गुंतवणूकदाराने आपल्या जोखीम पेलण्याच्या क्षमतेनुसारच यात गुंतवणूक करावी.

दुसरीकडे लार्जकॅप फंडांच्या बाबतीत चित्र पूर्णपणे वेगळे आहे. तेथे पोर्टफोलिओमध्ये खूप जास्त साम्य असते. बहुतांश लार्जकॅप फंड हे निर्देशांकातील समभागांचीच नक्कल करताना दिसतात. अशा वेळी एकापेक्षा जास्त सक्रिय लार्जकॅप फंड सांभाळण्यापेक्षा निफ्टी ५० किंवा निफ्टी १०० सारख्या पॅसिव्ह फंडांत गुंतवणूक करणे अधिक सयुक्तिक ठरते.

---

## एसआयपी कोणती फायदेशीर?




गुंतवणुकीच्या विश्वात शिस्तबद्ध मार्ग म्हणून सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन अर्थात 'एसआयपी'ने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या प्रक्रियेत गुंतवणूकदार ठराविक रक्कम ठराविक अंतराने म्युच्युअल फंडात जमा करतो. गुंतवणुकीच्या या प्रवासात प्रामुख्याने दोन पर्याय समोर येतात, ते म्हणजे दैनिक 'एसआयपी' आणि मासिक 'एसआयपी'. या दोन्ही पद्धतींचे मूळ तत्व समान असले, तरी त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये काही मूलभूत फरक आहेत.

दैनिक 'एसआयपी'मध्ये दररोज ठराविक रक्कम गुंतवली जाते, तर मासिक पर्यायमध्ये महिन्यातून एकदा मोठी रक्कम गुंतवली जाते.

दैनिक 'एसआयपी' प्रामुख्याने अशा लोकांसाठी उपयुक्त ठरते ज्यांच्याकडे रोजच्या स्वरूपात रोख रक्कम उपलब्ध असते किंवा ज्यांना बाजारातील प्रत्येक चढ-उताराचा लाभ घ्यायचा असतो. यालाच प्रगत 'रुपी कॉस्ट एव्हरेजिंग' असेही संबोधले जाते.

दररोज गुंतवणूक करतो तेव्हा बाजारातील दैनिन अस्थिरतेचा प्रभाव कमी होतो. उदाहरणार्थ, जर एखाद्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शेअर बाजार मोठ्या प्रमाणात घसरला आणि दुसऱ्या आठवड्यात तो अचानक वधारला, तर दैनिक गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीला त्या घसरणीच्या प्रत्येक दिवशी स्वस्त दरात युनिट्स खरेदी करण्याची संधी मिळते. याउलट, मासिक गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीची तारीख जर बाजार वधारलेला असताना आली, तर त्याला त्या महिन्यापुरते महाग दराने युनिट्स मिळतात. अशा प्रकारे दैनिक 'एसआयपी' बाजारातील सूक्ष्म हालचालींचा फायदा मिळवून देते.

सूक्ष्म गुंतवणुकीची शिस्त लागण्यासाठी दैनिक पर्याय हा एक उत्तम मार्ग आहे. ज्या गुंतवणूकदारांना एकदम मोठी रक्कम बाजूला काढणे शक्य नसते, ते दररोज १०० रुपयांपासून आपली गुंतवणूक सुरू करू शकतात. यामुळे आर्थिक नियोजनात लवचिकता येते आणि दीर्घकाळात चक्रवाढ व्याजाचा मोठा लाभ मिळण्यास मदत होते.

दुसरीकडे मासिक 'एसआयपी' हा सर्वाधिक लोकप्रिय आणि सोयीस्कर पर्याय मानला जातो. विशेषतः पगारदार वर्गासाठी हा पर्याय अत्यंत सुसंगत आहे, कारण महिन्याच्या सुरुवातीला पगार जमा झाल्यावर त्यातून ठराविक रक्कम थेट गुंतवणुकीसाठी वळवता येते. मासिक पर्यायामध्ये व्यवस्थापन करणे अतिशय सोपे असते. दिवसागणिक होणाऱ्या व्यवहारांची चिंता यात नसते, त्यामुळे बँक स्टेटमेंटमध्ये देखील गोंधळ होत नाही.

करांबाबत काय स्थिती?

म्युच्युअल फंडातून मिळणारा नफा हा भांडवली नफा कराच्या कक्षेत येतो. तुम्ही दररोज गुंतवणूक करा किंवा दरमहा, तुम्ही किती काळ गुंतवणूक टिकवून धरता यावर कराचे स्वरूप अवलंबून असते. एक वर्षापेक्षा जास्त काळ गुंतवणूक राहिल्यास त्याला दीर्घकालीन भांडवली नफा म्हणतात आणि त्यापूर्वी पैसे काढल्यास तो अल्पकालीन नफा मानला जातो.

दैनिक पर्यायामध्ये एक तांत्रिक अडचण अशी येऊ शकते की, जर एखाद्या दिवशी बँक खात्यात पुरेशी रक्कम नसेल, तर ती 'एसआयपी' अयशस्वी होऊ शकते आणि काही बँका त्यासाठी दंडही आकारू शकतात. मासिक पर्यायामध्ये अशा प्रकारच्या जोखमीचे व्यवस्थापन करणे सोपे असते. बाजारातील वेळ साधण्यापेक्षा बाजारात टिकून राहणे जास्त महत्त्वाचे असते, हे तत्व दोन्ही पद्धतींना लागू होते.

# आपल्या आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी भगवान महावीरांची पंचसूत्री उपयुक्त

## प्रा.गणेश लोळगे यांचा विश्वास; भगवान महावीर व्याख्यानमालेचा आनंदधाममध्ये शुभारंभ

नगर – आपल्या आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी भगवान महावीरांची पंचसूत्री उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्रा.गणेश लोळगे (कोल्हापूर) यांनी व्यक्त केला.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म. सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचा शुभारंभ करताना आयुष्याला द्यावे उत्तर या विषयावर ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी वक्त्याचा परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला) यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, सिमरन मुनोत आदी उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.



राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म. सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचा शुभारंभ करताना प्रा.गणेश लोळगे आदी. शेजारी व्याख्यानमालेतील क्षणचित्रे.

प्रा. लोळगे पुढे म्हणाले, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य आणि अपरिग्रह ही भगवान महावीरांची पंचसूत्री आयुष्याचे उत्तर शोधण्यासाठी उपयुक्त ठरणारी तसेच मन:शांती मिळवून देणारी आहे. प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रश्न वेगवेगळे असतात. प्रत्येकाच्या आयुष्याची प्रश्नपत्रिका वेगळी असते. आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्यालाच शोधावे लागते. आपण उत्तर कसे शोधतो? यावर समाधान अवलंबून असते. आपल्याला जे क्षेत्र आवडते त्या क्षेत्रात जीवनभर काम करावे. लोक माझ्याबद्दल काय विचार करतात? यापेक्षा मी माझ्या आयुष्यासाठी काय करू शकेल? हे समजले तर आयुष्याचे उत्तर निश्चित सापडते.

दुसऱ्यांशी तुलना करत आपण आपला आनंद हरवत चाललो आहोत. दिवसातील दहा ते अठरा तास स्क्रीन टाईममध्ये घालवणारे रीडिंग टाईमसाठी किती वेळ देतात? हा प्रश्न आहे. पुस्तक वाचायला शिकल्याने माणसं समजणे शिकता येते आणि आयुष्याचे उत्तर हाती येते.

आपण वस्तूंसाठी नाही तर वस्तू आपल्यासाठी आहेत, याचे भान असले पाहिजे. स्वत:वर प्रेम करायला शिकले पाहिजे. आई, वडील आणि मातृभूमीवर प्रेम केले तरच आयुष्याचे उत्तर सापडून जीवन समाधानी, सुखी, आनंदी होईल. दुसऱ्यांचे अश्रू पुसता आले तरच आपल्याला जीवनाचे मर्म कळेल. आपण वर्तमानात जगायचे विसरून गेल्याने जीवनात समस्या, ताण–तणाव निर्माण होत चालले आहेत. सकारात्मक भूमिकेतून वास्तववादी जगात जगता आले पाहिजे, असे सांगताना त्यांनी विविध प्रसंगाआधारे केलेले काव्य वाचन श्रोत्यांची दाद मिळवणारे ठरले.

व्याख्यानमालेच्या शुभारंभ दिनी स्त्री–पुरूष श्रोत्यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

# मी आणि अध्यात्म यामधील इगो हा अडथळा

## 'तुमचे आमचे अध्यात्म' विषयावर सतीश फडके यांचे व्याख्यान; भगवान महावीर व्याख्यानमाला – पुष्प दुसरे

नगर – विज्ञान, श्रध्दा, अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिक आणि अध्यात्मिक हे वेगवेगळे विषय आहेत. मी आणि अध्यात्म यामधील इगो हा मोठा अडथळा आहे, असे मत सतीश फडके यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे व्दितीय पुष्प गुंफताना तुमचे आमचे अध्यात्म या विषयावर ते बोलत होते. नवकार महामंत्राने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सपना कटारिया यांनी स्वागत केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी वक्त्याचा परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत आणि राहुल मुनोत (नेवासावाला) यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सिमा मुनोत, सुरेश कटारिया आदी उपस्थित होते. संतोष गांधी यांनी आभार मानले.

श्री.फडके पुढे म्हणाले, विज्ञान, श्रध्दा, अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिकता या पलिकडे अध्यात्मिक व्यक्ती असते. धार्मिकतेच्या आणि श्रध्देच्या नावाखाली कर्मकांड करणारे अध्यात्मिक नव्हेत. काही गुरू– सद् गुरू आपल्या शिष्यांना







राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म. सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना सतीश फडके. व्याख्यानमालेतील क्षणचित्रे.

कर्मकांडातच रमवतात. सत्संग शुध्द ज्ञानापर्यंत नेणारा पाहिजे. आपल्या पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरा आणि कर्मकांड यामध्ये गैरसमजच खुप आहेत. आजच्या खोट्यांच्या बाजारात सर्वसामान्यांना नेमके खरे काय? तेच कळत नाही.

मला सगळे कळते ही महाचूक असते. जे चुकते ते मान्य करणे ही अध्यात्माची पहिली पायरी. आपण कोण? याचे उत्तर शांतपणे पाहिले पाहिजे. ईश्वर प्राप्ती हा मुख्य उद्देश समोर ठेवून प्रपंच नेटका केला की, मग परमार्थ साधावा. संन्यास घेऊन लवकर ईश्वर प्राप्ती करता येईलच, असे नाही! प्रापंचिक माणूस लवकर अध्यात्मिक होऊन ईश्वर प्राप्ती पर्यंत पोहोचतो. संसारात जो राहू शकला तो अध्यात्मिक होण्याची फुल गॅरंटी असते. ईश्वर प्राप्तीसाठी संन्यास घेण्याची अजिबात गरज नाही. आपले देव आणि गुरू यांच्याबद्दल भिती नव्हे तर आदर, आपलेपणा, प्रेम वाटले पाहिजे. देवांशी आणि गुरूंशी आपल्याला मनमोकळेपणाने बोलता आले पाहिजे. मार्गदर्शन घेता आले पाहिजे. आपल्या तक्रारी घेऊन सद् गुरूंकडे जावू नका. आपल्या संसाराची ओझी सद् गुरूंवर टाकू नका. सद् गुरूंचा उपयोग प्रापंचिक समस्यांची सोडवणूक करून घेण्यासाठी न करता अध्यात्मिक उन्नतीसाठी करा, असे आवाहन श्री.फडके यांनी केले.

व्याख्यानमालेचा लाभ घेण्यासाठी शहर आणि उपनगरातील स्त्री–पुरूष श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

# जेऊरच्या सोलर प्रकल्पातून केबल चोरी; गुन्हा दाखल

नगर –जेऊर बायजाबाई (ता. नगर) शिवारातील सोलर प्रकल्पातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ८० हजार रूपये किमतीची ६ हजार ५०० मीटर केबल चोरी करून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोलर कंपनीचे सिक्युरिटी गार्ड सोमनाथ काशीनाथ तोडमल (वय ३७, रा. जेऊर बायजाबाई) यांनी २१ मार्च रोजी सायंकाळी फिर्याद दिली आहे. अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १८ मार्च रोजी सायंकाळी पाच ते १९ मार्च रोजी सकाळी नऊ वाजताच्या दरम्यान घडली आहे. जेऊर बायजाबाई शिवारातील घुरवडी डोंगर परिसरात असलेल्या सोलार कंपनीच्या प्रकल्पातून ही चोरी करण्यात आली. या घटनेत अज्ञात चोरट्यांनी ४ मिमी जाडीची, काळ्या रंगाची, कॉपर तार असलेली अंदाजे ६ हजार ५०० मीटर १ हजार ५०० डीसी सोलार केबल लंपास केली आहे, असे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

# शॉर्टसर्कीटमुळे पेटला गव्हाचा कोंडा, आग लागली उसाला

## महापालिकेच्या अग्निशमन दल घटनास्थळी दाखल



केडगाव देवी रोडवरील शेतातील उसाला लागलेली आग विझविताना महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे पथक. (छाया – अमित मन्यार)

नगर – वीजेचे शॉर्टसर्कीट होऊन शेतातील गव्हाच्या कोंड्याने पेट घेतला. वाऱ्यामुळे ही आग भडकली अन् शेजारीच असलेल्या उसानेही पेट घेतला. मात्र, महापालिकेच्या अग्निशमन बंबाने तातडीने घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली. ही घटना केडगाव येथे २३ मार्च रोजी दुपारी घडली.

याबाबत समजलेली माहिती अशी की, केडगाव येथील देवी रोड परिसरात वीट भट्टीजवळ विश्वनाथ कोतकर यांची शेती आहे. त्यांनी नुकतीच हार्वेस्टरद्वारे गव्हाची काढणी केली आहे. या गव्हाचा कोंडा शेतात तसाच पडून होता. शेताची नांगरट झालेली नव्हती. २३ मार्च रोजी दुपारी त्याच्या शेतावरुन गेलेल्या महावितरणच्या विद्युताहक तारेला शॉर्टसर्कीट झाले. त्यातून ठिणगी उडून शेतातील गव्हाचा कोंडा पेटला. वाऱ्यामुळे ही आग चांगलीच भडकली आणि काही वेळातच शेजारील शेतात असलेल्या उसानेही पेट घेतला. हा ऊसदेखील कोतकर यांच्याच मालकीचा आहे. उसाला आग लागल्यामुळे ही आग विझविण्यासाठी कोतकर यांची एकच धांदल उडाली. त्यांनी तातडीने महापालिकेच्या अग्निशमन विभागाला कॉल करुन माहिती दिली. त्यानंतर महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे दोन बंब तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तातडीने पाण्याचा मारा करीत आग आटोक्यात आणली. त्यामुळे उसाचे होणारे मोठे नुकसान टळले. याबाबत महापालिकेच्या अग्निशन विभागाचे प्रमुख मिसाळ यांनी सांगितले की, अग्निशमन विभागाचा बंब तातडीने घटनास्थळी पोहोचल्यामुळे मोठे नुकसान टळले आहे. मात्र, काही प्रमाणात संबंधित शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.

महापालिकेच्यावतीने फायरमन मच्छिंद्र धोत्रे, युवराज रासकर, विठ्ठल चिकळे, अविनाश साठे, चालक भांगरे यांनी ही आग आटोक्यात आणली. शॉर्टसर्कीटमुळे आग लागल्याचे तेथील लोकांनी सांगितले.

# कॅप्टन खरात मुक्त भारत या संकल्पनेतून 'पीपल्स'तर्फे राष्ट्रव्यापी जनजागृती अभियान

## वैज्ञानिक विचारांसाठी समाजाला हाक, गावागावात 'समजा, तपासा, सुधारा' ही त्रिसूत्री पद्धत राबवली जाणार



नगर – नाशिक येथील कॅप्टन खरात प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्राच्या विवेकाला हादरा दिला असून, अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजात घडणाऱ्या शोषणाचे भीषण वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर कॅप्टन खरात मुक्त भारत या संकल्पनेतून पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने राष्ट्रव्यापी जनजागृती अभियानाची घोषणा करण्यात आली आहे.

ॲड. कारभारी गवळी यांनी या प्रकरणाकडे केवळ एका गुन्हेगाराच्या कृत्याच्या रूपात न पाहता, तो एक व्यापक सामाजिक आजार असल्याचे स्पष्ट केले. प्रश्न फक्त त्या व्यक्तीने काय केले याचा नाही, तर समाजाने त्याला अशी संधी का दिली? असा मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

विज्ञानाला विरोध करणारे विश्वास, भीतीवर आधारित श्रद्धा, देव रागावेल या भीतीमुळे प्रश्न न विचारणे, तथाकथित बाबांवर आंधळा विश्वास, तसेच स्त्रिया किंवा काही जाती कनिष्ठ आहेत अशी धारणा – या सर्व चुकीच्या माहितीच्या स्वरूपात समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. कॅप्टन खरातसारखे लोक या श्रद्धा निर्माण करत नाहीत; ते समाजात आधीपासून अस्तित्वात असलेल्या चुकीच्या विश्वासांचा गैरवापर करून समाजातील कमजोर घटकांचे शोषण करतात, असेही गवळी यांनी नमूद केले.

जेव्हा समाजात चुकीची माहिती वाढते, तेव्हा विचारशक्ती कमी होते, भीती वाढते, लोक सहज फसवले जातात आणि अन्यायाला खतपाणी मिळते. या प्रक्रियेला 'सामाजिक अराजकता' (Social Entropy) असे संबोधले जाते. यामुळे समाजाच्या बौद्धिक क्षमतेचा हळूहळू ऱ्हास होतो.

अशा घटनांमध्ये एक ठरावीक पद्धत दिसून येते – आधी कमजोर व्यक्तींची निवड, त्यानंतर दैवी शक्तीचा दावा, व्यक्तीला कुटुंब व तर्कशक्तीपासून दूर नेणे आणि शेवटी शोषणाला 'आध्यात्मिक' स्वरूप देणे. समूह दबावाद्वारे विरोध थांबवणे ही त्याची अंतिम पायरी असते.

अंधश्रद्धा आणि जात व्यवस्था या वेगळ्या समस्या नसून, त्या एकाच चुकीच्या माहितीच्या मुळातून निर्माण झालेल्या आहेत. जात व्यवस्था माणसाला जन्मावरून कमी ठरवते, तर अंधश्रद्धा माणसाला प्रश्न विचारण्यापासून रोखते. या दोन्ही मिळून मानसिक गुलामीची साखळी तयार होते, असे स्पष्ट करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर RECONSCIO गव्हर्नन्स अंतर्गत जनलोक संडे स्कूल ही संकल्पना मांडण्यात आली आहे. दर रविवारी गावागावात व शहरांमध्ये नागरिकांना एकत्र करून विचारपरिवर्तनाची सत्रे घेण्यात येणार आहेत.

या उपक्रमात 'समजा, तपासा, सुधारा' ही त्रिसूत्री पद्धत राबवली जाणार आहे:

समजा : अंधश्रद्धेचे स्वरूप आणि तिची निर्मिती समजून घेणे

तपासा : मानवी प्रतिष्ठा, वैज्ञानिक पुरावे आणि सर्वांच्या कल्याणाच्या निकषांवर श्रद्धेचे परीक्षण

सुधारा : चुकीच्या विश्वासांऐवजी वैज्ञानिक व तर्कसंगत विचार स्वीकारणे

या मोहिमेत कायदेविषयक जनजागृती, महिला सशक्तीकरण, तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, माध्यमांद्वारे सत्य उघड करणे आणि 'जनलोक अदालत'च्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व निर्माण करणे यावर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत अंधश्रद्धेवर आधारित गुन्ह्यांमध्ये घट, जातीय भेदभावात कमी आणि अधिक वैज्ञानिक व एकसंध समाज घडवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

ही लढाई कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नसून चुकीच्या विचारांविरुद्ध आहे, असे स्पष्ट करत नागरिकांना सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती विकसित करावी, पालकांनी मुलांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन द्यावे, तरुणांनी वैज्ञानिक दृष्टिकोन पसरवावा आणि प्रत्येक नागरिकाने अंधश्रद्धेविरुद्ध उभे राहावे, असे आवाहन करण्यात आले.या मोहिमेसाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहाद्दूर प्रजापती, सचिन कुक्कडवाल, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, पोपट भोसले, धनंजय मडके, कैलास पठारे, अशोक भोसले आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# हिवरे बाजार ग्रामस्थांकडून भोंदूबाबा अशोक खरातचा निषेध

नगर – नुकतीच समाजमाध्यमांवर पोपटराव पवार व हिवरे बाजारने केले भोंदूबाबाचे कौतुक करून त्याला मदत केली या मथळ्याची बातमी फिरत आहे. ग्रामस्थांनी या पार्श्वभूमीवर बैठक घेऊन या कृत्याचा निषेध करून त्याला योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे असे मत व्यक्त केले. गेल्या ३५ वर्षाच्या कष्टामुळे आज हिवरे बाजारचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पद्मश्री सारखा सन्मान मिळून जगाच्या नकाशावर गेलेले आहे. अशा परिस्थितीत वाईट वृत्तींना पाठबळ देण्याचे काम कदापि हिवरे बाजारकडून शक्यच नाही त्यामुळे हि बातमी चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात आली आहे.


हिवरे बाजार हे महाराष्ट्राच्या वारकरी संतांच्या विचारावर आधारित पर्यावरण, वनसंवर्धन, जलसंवर्धन, स्वच्छता, व्यसनमुक्ती, स्वयंशिस्त यावर उभे राहिलेले असून ग्रामविकासाबरोबरच अध्यात्माची बैठक या गावात उभी राहिलेली आहे. हिवरे बाजारमधील विकासकामे पूर्ण झाल्यानंतर ग्रामस्थांनी सन २०१२ मध्ये बैठक घेऊन जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार लोकवर्गणीतून करण्याचा निर्णय घेतला होता. त्या मंदिरांच्या कलशारोहन समारंभासाठी अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यात प्रामुख्याने वै.ह.भ.प.विठ्ठल महाराज देशमुख (आळंदी), देवगड संस्थांनचे महंत ह.भ.प.भास्करगिरी महाराज, मौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी (कर्नाटक), ह.भ.प.काडसिद्धेस्वामीजी (कणेरी मठ कोल्हापूर), ह.भ.प.उद्धव महाराज मंडलिक (नेवासा), ह.भ.प.डॉ.नारायण महाराज जाधव (आळंदी) तसेच इतरही १० ते १२ वारकरी संप्रदायातील अधिकार पुरुष यांच्या प्रमुख उपस्थितीत कलशारोहन समारंभ संपन्न झाला.त्या कार्यक्रमाचे निमंत्रण खरातला दिले होते त्यानुसार तो उपस्थित होता.

सध्या समाजमाध्यमांवर जी बातमी फिरत आहे हा व्हिडीओ चार वर्षापुर्वीचा असून तो कार्यक्रम सिन्नर मिरगाव येथील ईशान्येश्वर मंदिरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. त्यासाठी १० ते १२ वारकरी संप्रदायातील मंडळीसोबत हजारोवर जनसमुदायाच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. तोपर्यंत खरातची विकृत प्रवृत्ती माहिती नव्हती. त्यानंतर नाशिकमध्ये इतर कार्यक्रमाप्रसंगी खरातशी बोलण्याचा संबंध आला. त्यातही हिवरे बाजारचे धार्मिक कार्य सोडून खरातशी कुठलाही दुरान्वये संबंध आलेला नाही.

राज्यभर विविध कार्यक्रमात प.पु. रविशंकर, प.पु.रामदेव बाबा, प.पु.एम.सर, प.पु.कमलेश पटेल उर्फ दाजी (कान्हा शांतिवन हैदराबाद), गुरुमाउली आण्णासाहेब मोरे (दिंडोरी), ब्रम्हकुमारीज (माउंट अबू), श्री क्षेत्र शेगाव येथील वै.शिवशंकर भाऊ आदी मान्यवरांच्या समवेत संतांच्या व्यासपीठावर जाण्याचा योग मला आला.श्री क्षेत्र शिर्डी, श्री क्षेत्र शिंगणापूर, श्री क्षेत्र देवगड तसेच मला देशभरातील कैलास व मानसरोवर या प्रमुख नद्यांची यात्रा करायला मिळाली. अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे राज्यस्तरीय दोन दिवसाचे शिबीर कै.नरेंद्र दाभोळकर यांनी हिवरे बाजारला घेतले होते. कुठलीही घटना घडली त्याचाशी काहीही संबंध नसणाऱ्या व्यक्तीवर जबाबदारी टाकणे हे चुकीचे आहे. हिवरे बाजार हे गेल्या ३५ वर्षात कुठल्याही वितंडवादात पडलेले नाही असे ही पद्मश्री पोपटराव पवार यांनी म्हंटले आहे.

# आंबेडकरी चळवळीचा आवाज दाबण्याचे काम जिल्हा व पोलीस प्रशासन करत आहे

## सकल आंबेडकरी समाज जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार; जयंती नियोजन बैठकीत प्रशासनविरोधात नाराजीचा सूर : अजय साळवे



नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित नियोजन बैठकीत जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. आंबेडकरी चळवळीचा आवाज दाबण्याचे काम प्रशासनाकडून होत असल्याचा आरोप बैठकीचे अध्यक्ष व माजी नगरसेवक अजय साळवे यांनी केला.

सकल आंबेडकरी समाजाच्या वतीने दादासाहेब रुपवते विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही बैठक पार पडली. बैठकीच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शक अशोक गायकवाड, प्रा. जयंत गायकवाड, सुनील क्षेत्रे, प्रा. विलास साठे, प्रा. जाधव, सुनील साळवे, गौतम म्हस्के, सुमेध गायकवाड, अमित काळे, महेश भोसले, विनोद गायकवाड, किरण दाभाडे, सनी माघाडे, संजीवन साळवे, अजय भिंगारदिवे, राजूभाऊ शिरसाठ, आशुतोष अजय भिंगारदिवे, मुन्ना भिंगारदिवे, संजय भिंगारदिवे, महेश शेळके, रमेश भिंगारदिवे, गौरव भाकरे, प्रेम साळवे, संजय साळवे, आमन काते, विशाल साळवे, सिद्धार्थ पगारे, राहुल साळवे, वृषाल साळवे, वैभव डाके, रतन तुपविहिरे, किरण गायकवाड, सुशील साठे, रुपेश शेलार, सचिन शेलार, सागर ठोकळ, अतुल सोनवणे, किरण शिंदे, किरण शिरसाठ, अजित नरवडे, सुशांत शिरसाठ, संदेश भोसले, श्रीकांत भोसले, जाफर बेग, विजय गायकवाड, मनोज रणमले, कौशल गायकवाड, अजय पाखरे, प्रबुद्ध कांबळे, साहिल शेख, करण साळवे, सुजित घंगाळे, नितीन कसबे, आकाश शिंदे, अमित घाटविसावे, उदय गायकवाड, तेजस गायकवाड, अजय गायकवाड, शिवम झेंडे, सुजित उघडे, विशाल गायकवाड, वेदांत शेलार, जयेश पंडित, ओंकार गांगर्डे, किरण पवार, तुषार बोराडे, आकाश सरोदे, मोनेश पंडित, शार्वीन साळवे, ओमकार शेलार, अनिकेत साळवे, यश शेलार आदी कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटना व आंबेडकरी चळवळीतील विविध गटांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना अजय साळवे म्हणाले की, आपण सीडी लावण्यासाठी एकत्र आलो नाही, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भव्य स्वरूपात साजरी करण्यासाठी एकत्र आलो आहोत. प्रशासनाने सीडी लावण्यास परवानगी दिली किंवा नाही दिली, तरी जयंती उत्साहात साजरी होणारच आहे. तसेच, प्रशासनाने योग्य भूमिका घेतल्यास मिरवणुकीत सीडी संदर्भात मार्ग निघू शकतो आणि त्यासाठी जयंती उत्सव समिती प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रमुखत्वे सीडी परवानगीसाठी ठराविक तारीख निश्चित करणे, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व लोकप्रतिनिधी यांची भेट घेऊन निवेदन सादर करणे, जयंती कालावधीत प्रत्येक मोहल्यातील कार्यक्रमांचे समन्वय साधणे, मिरवणूक मार्गाचे नियोजन व आवश्यक परवानग्या, शहरस्तरीय जयंती समिती गठीत करणे, या सर्व बाबींवर एकमताने निर्णय घेण्यात आला. यासाठी मंगळवारी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्याचे ठरविण्यात आले.

जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मॅरेथॉन यांसारख्या उपक्रमांचे आयोजन करून तरुणांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच महात्मा फुले जयंतीही साजरी करण्याचे नियोजन करण्यात आले.

या बैठकीत अशोक गायकवाड, संजय भिंगारदिवे, किरण दाभाडे, प्रा. जयंत गायकवाड, प्रा. विलास साठे, सुनील क्षेत्रे, सुमेध गायकवाड, अमित काळे, सनी माघाडे, सागर ठोकळ आदींनी आपले विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. जयंत गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक महेश भोसले यांनी केले. शहरातील विविध भागांतील कार्यकर्ते तसेच आंबेडकरी चळवळीतील विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीतून आंबेडकरी समाजाने एकसंघतेचा संदेश देत, जयंती उत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहात साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला.

